MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष तेवीसावे / अंक ४ / एप्रिल २०२२

## संपादकीय

### विज्ञान प्रसारकांचे समाजातील स्थान

विज्ञान हे एक 'विशेष ज्ञान' आहे. प्रयोग, निरीक्षण, तर्क यांच्या आधारे वैज्ञानिकांनी निसर्गातील गुपिते समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रयत्नांतून तर्कसंगत अशी एक विचारप्रणाली विकसित झाली. या विचार प्रणालित अंधश्रद्धेला आणि निराधार माहितीला स्थान नाही. पृथ्वी केंद्रस्थानी असून सूर्य, चंद्र आणि सगळे ग्रह-तारे पृथ्वीभोवती फिरतात असा विश्वास समाजात रूढ होता. खगोलशास्त्रज्ञांनी सूक्ष्म निरीक्षण करून असे सिद्ध केले की, पृथ्वी नाही; तर सूर्य केंद्रस्थानी आहे. हे सत्य समाजात रुजायला अनेक वर्षे लागली. तसेच देवीचा रोग हा देवी कोपल्यामुळे होतो अशी श्रद्धा होती. सूक्ष्मजीव शास्त्रज्ञांनी असे दाखवून दिले की, हा रोग विशिष्ट जंतू शरीरात गेल्यामुळे होतो. या शोधाच्या आधारे देवी होऊ नये यासाठी लस विकसित करण्यात आली. तिचा वापर करून देवी रोगाचा समूळ नायनाट करण्यात यश आले आहे. वैज्ञानिक त्यांच्या प्रयोगशाळेत वेगवेगळी सूत्रे शोधण्याचा प्रयत्न करतात; तर दुसरीकडे सामान्य लोक अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन चुकीची कामे करीत असतात. वैज्ञानिक आणि सामान्य जनता यातील दुवा म्हणजे 'विज्ञान प्रसारक' होत.

विज्ञानाचा प्रसार करणे हे जिकिरीचे काम आहे. यासाठी विज्ञान प्रसारकाला विज्ञानाचे चांगले ज्ञान असणे आवश्यक असते. त्याचबरोबर माहीत असलेले वैज्ञानिक तत्त्व सर्वसामान्य लोकांना समजावून देण्याची कला त्याला अवगत असणे आवश्यक आहे. विज्ञानाची एक विशिष्ट भाषा आहे. त्यात पारिभाषिक शब्दांचा खूप भरणा असतो. हे शब्द सर्वसामान्य लोकांना परिचित नसतात. त्यामुळे वैज्ञानिक तत्त्व समजावून देण्याची जबाबदारी विज्ञान प्रसारकावर पडते. ही सर्कस करण्यात अनेक जण यशस्वी झाले आहेत. जगातल्या विविध भाषांत विज्ञान प्रसाराचे कार्य करणारे अनेक कार्यकर्ते आज उपलब्ध आहेत. त्यांच्यामध्ये विचारांची आणि अनुभवाची देवाणघेवाण होणे गरजेचे आहे. यासाठी मार्च महिन्यात दोन दिवसांचा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. नॅशनल सेंटर फॉर सायन्स कम्युनिकेशन (National Centre for Science Communication), मुंबई आणि विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

या दोन संस्थांनी एकत्र येऊन २५ आणि २६ मार्च २०२२ रोजी या परिसंवादाचे आयोजन केले होते. परिसंवादासाठी निवड केली ती कोकणातील गुहागर जवळील वेळणेश्वर या गावाची. समुद्र किनाऱ्यावर वसलेल्या या गावात ठाण्याच्या विद्या प्रसारक मंडळाने मागील दशकात एक उच्च दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय उभारले आहे. महाविद्यालयाचा परिसर खूप मोठा असून अनेक सुविधांनी युक्त आहे. याच महाविद्यालयाच्या 'नाना फडणवीस सभागृहात' या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

विज्ञान-प्रसार या क्षेत्राशी निगडित विविध घटकांवर या परिसंवादात चर्चा झाली. ''विज्ञान-प्रसार अनेक प्रकारांनी करता येतो. व्याख्यान किंवा प्रयोग दिग्दर्शन हा विज्ञान प्रसाराचा अतिशय प्रभावी असा मार्ग आहे. प्रसिद्ध ब्रिटिश शास्त्रज्ञ मायकेल फॅरेडे याच पद्धतीने विज्ञान सर्वसामान्य लोकांना समजावून सांगत असत. लेखनाच्या माध्यमातून विज्ञान-प्रसार करण्याचे व्रत काही विज्ञान प्रसारकांनी स्वीकारले. विज्ञानातील गुंतागुंतीच्या संकल्पना ही मंडळी सोप्या भाषेत समजावून देतात. विसाव्या शतकात रेडिओ आणि दूरचित्रवाणी संच उपलब्ध झाले. त्यामुळे या यंत्राच्या मदतीने विज्ञान-प्रसार करण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्याची पुढची पायरी म्हणजे संगणक क्रांती होय. या क्रांतीने माहितीचे महाजाल उपलब्ध करून दिले. आजच्या घडीला कोणतीही माहिती आपण संगणकाच्या सहाय्याने मिळवू शकतो. या विकासामुळे माहिती देण्याचे विविध मार्ग उपलब्ध झाले. त्याची जाणीव ठेवून विज्ञान प्रसारकांनी आपल्या कामात योग्य ते बदल करण्याची गरज आहे'' असे विचार परिसंवादाचे बीजभाषण देताना प्रसिद्ध वैज्ञानिक डॉ. बाळ फोंडके यांनी मांडले.

प्रस्तुत परिसंवादासाठी विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले होते. त्यात एक होते अणुऊर्जा आयोगाशी संबंधित असलेले डॉ. एस. के. मल्होत्रा. ''अणुऊर्जा प्रकल्प उभारणे म्हणजे किरणोत्सर्गाचा धोका निर्माण करणे असे एक समीकरण समाजात तयार झाले आहे. त्यामुळे असे प्रकल्प उभारायचे असतील तर त्याला लोकांचा विरोध होतो. हा विरोध काढण्यासाठी शक्तीची नाही तर युक्तीची गरज असते. या प्रकल्पातील संभाव्य धोके आणि त्याचे फायदे तेथील जनतेला वैज्ञानिक तथ्यांच्या आधारे समजावून देण्याची गरज आहे'' असे आग्रही प्रतिपादन डॉ. मल्होत्रा यांनी केले. आपल्या अनुभवांतील अनेक उदाहरणे देऊन त्यांनी आपले म्हणणे प्रेक्षकांना समजावून दिले.

''आकाशवाणीने आपले जाळे देशभर विणले आहे. महाराष्ट्रात जवळजवळ प्रत्येक जिल्ह्यात एक आकाशवाणी केंद्र आहे. त्यांचा प्रेक्षकवर्ग हा प्रामुख्याने ग्रामीण भागातील असतो. त्यामुळे आकाशवाणीसाठी कार्यक्रम तयार करताना या बाबींचा विचार करणे अत्यावश्यक असते'' असे आग्रही प्रतिपादन

(पृष्ठ क्र. ३ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा



वर्ष तेवीसावे/अंक ४/एप्रिल २०२२

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २६ वे/अंक १० वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | वेळणेश्वर भेट | प्रा. विनोद एच. वाघ | ३ |
| ३) | खरी कविता कशी असते? | डॉ. आनंद कुलकर्णी | ५ |
| ४) | आर्थिक दुर्बलता... व्याख्या, व्याप्ती, व्याकरण | चन्द्रशेखर टिळक | ८ |
| ५) | 'अवघा देहची वृक्ष जाहला' या पुस्तकाचा प्रकाशन सोहोळा | डॉ. संजय जोशी | १२ |
| ६) | सुयोग्य पालकत्व | सौ. रश्मी रोहित नाटेकर | १७ |
| ७) | भारतीय खगोलशास्त्राचा उगम व विकास | डॉ. प्रशांत धर्माधिकारी | १९ |
| ८) | 'जिंकलेले क्षण' | आचार्य जयप्रकाश बागडे | २२ |
| ९) | हिंदुत्व समजून घेताना | तुषार दामगुडे | २४ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | २७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. ‘दिशा’च्या संदर्भात

- ❖ आपण ‘दिशा’ नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- ❖ हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- ❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- ❖ आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून ‘दिशा’ला सहकार्य करू शकता.
- ❖ आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- ❖ आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- ❖ दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- ❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- ❖ www.vpmthane.org या संकेतस्थळावर ‘दिशा’चे जुने अंक आपण पाहू शकता.
- ❖ वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश ‘विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा’ या नावाने पाठवावा.
- ❖ कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# वेळणेश्वर भेट

## (भाग दुसरा)

## वेळणेश्वरची अभियांत्रिकी

*विद्या प्रसारक मंडळाच्या टी एम सी विधी महाविद्यालयाने वेळणेश्वर येथील विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयास व वेळणेश्वर परिसरास भेट दिली. त्या भेटीचा अनुभव या लेखात कथन केला आहे- संपादक*

मागील भागात वेळणेश्वरला जाण्याचे कारण सांगितले होते. या परिसरातील निसर्ग सौंदर्यविषयी ही चर्चा करणे आवश्यक आहे. संपूर्ण कोकण जरी निसर्गाचा आवडता आणि लाडका पुत्र आहे याचा प्रत्यय कोकणात आल्यावर येतोच, पण विषय फक्त वेळणेश्वरचाच असल्यामुळे त्याचीच चर्चा आपण इथे करू या.

वेळणेश्वरच्या निसर्गाच्या चर्चेमध्ये सर्वप्रथम क्रमांक लागतो हिरव्या रंगाचा. हिरवा रंग हा निसर्गाचा आवडता रंग, तो रंग वेळणेश्वरच्या मातीत जागोजागी उठून आणि फुलून आलेला दिसतो. मार्च महिना म्हणजे उन्हाळ्याची सुरुवात.. या महिन्यात महाराष्ट्राच्या व देशाच्या इतर भागांमध्ये उन्हाचा काय तळतळाट असतो हे नव्याने सांगायची काही गरज नाही. परंतु कोकणाच्या व वेळणेश्वरच्या हिरवाईने हा तळतळाट तेथील लोकांच्या वाटेवर येऊ दिला नाही हे मात्र खरे. चिपळूण ते वेळणेश्वर हा बसने केलेला प्रवास तुम्हाला हिरव्या रंगाच्या अनेक छटा दाखवित पुढे पुढे नेत असतो. रस्ता लहान आहे पण दोन्ही बाजूने गर्दीत उभी हिरवी झाडे तुमचा प्रवास खूप सुखकारक करतात. अनेक प्रकारची झाडे इथे बघायला मिळतात. त्या झाडांचे जमीनीशी असलेले घट्ट नाते आपल्याला आपसुकच त्यांच्या प्रेमात पाडतात. वेळणेश्वरमधील रस्ते मात्र खूप लहान आहेत. शासनाने त्याकडे लक्ष देऊन त्यांची रुंदी वाढवली पाहिजे असे वाटते. परंतु रहदारी नाममात्र असल्याकारणाने रस्त्याचे अरुंदपण जाणवत नाही. वेळणेश्वरची घरे जरी आधुनिक पद्धतीने बांधलेली असली तरी घराच्या अंगणात हिरवाई दिसतेच दिसते. नारळ, आंबा, फणस ह्या झाडांशिवाय जसे अंगण पूर्णच होऊ शकत नाही अशा पद्धतीने अंगण, वाडे सजविण्यात आलेले आहेत. घरांच्या बांधकामाचे एक वैशिष्ट्य इथे नमूद करणे फार आवश्यक आहे. इथे भिंत उभारण्यासाठी विटांचा वापर होत नाही, तर वेळणेश्वरच्याच भूमीत दडलेल्या 'जांबा' या दगडाचा वापर होतो. परिसरास भेट देतांना जागोजागी जांबा कटींगची कामे बघितली. जमीन खोदून अशाप्रकारे जांबा बाहेर काढणे निसर्गावर काय परिणाम करू शकते यावर विद्वानांनी मार्गदर्शन करावे. थोडक्यात; वेळणेश्वरमधील हिरवाई बघण्यासारखीच आहे. चाफा, सदाफुली, बोगन यांची फुले तर जागोजागी फुललेली दिसतात. आमच्या भेटीच्या वेळेस आंब्यांना मोहोर आलेला होता, लहान लहान कैऱ्याही बघायला मिळाल्या.

दुसरा क्रमांक लागतो तो म्हणजे वेळणेश्वरच्या समुद्रकिनाऱ्याचा. मी आजपर्यंत मुंबई, गुजरात, गोवा येथील समुद्र किनारे बघितलेले आहेत पण वेळणेश्वर सारखा स्वच्छ, सुंदर आणि निर्जन समुद्र-किनारा कधीच नाही बघितला. समुद्राचे पाणी इतके नितळ असू शकते यावर विश्वास वेळणेश्वरला जाऊन पटतो. इथला समुद्र किनारा खूप लांब आणि विशेष म्हणजे निर्जन आहे. गावातली काही माणसे, थोडेसे पर्यटक असे जेमतेम

लोक इथे असतात. इथल्या वाळूत फुटलेल्या दारूच्या बाटल्या नाहीत, दगड नसल्यामुळे दगडामागच्या करामती नाहीत, पूर्ण किनाऱ्यावर एकही दुकान नाही. दुकाने आहेत ती बीचच्या बाहेर. त्यामुळे कोणत्याही प्रकारची घाण नाही, प्लास्टिक नाही, गटारीचे पाणी अजूनपर्यंत समुद्रात न सोडल्यामुळे पाणी निळेभोर आणि नितळ दिसते, एवढे की खालचे दगड, खडक आणि मासेही दिसतात.



या ठिकाणी एक भलामोठा पाटाच्या आकाराचा नैसर्गिक खडक आहे. गावकरी त्यास 'भीमाचा पाट' म्हणतात. इथल्या समुद्र-किनाऱ्यावरूनचा सूर्यास्त बघण्यासारखा आहे. आमच्या तीन दिवसांच्या मुक्कामात आम्ही या किनाऱ्याला तीन वेळा भेट दिली यावरून तुम्ही या किनाऱ्याचे आकर्षण मोजू शकतात. या समुद्र किनाऱ्याशिवाय वेळणेश्वर ते गुहागर आणि वेळणेश्वर ते गणपतीपुळे या रस्त्यावर तुम्हाला अनेक बीच सापडतात. अर्थात तिथे जाणे आम्हास शक्य झाले नाही, परंतु बसमधून या सर्व बीचेसची सुंदरता आम्ही बघू शकलो. वेळणेश्वरला समुद्राने आणि निसर्गाने अनेक भेटी दिल्या आहेत, त्याचे जतन करणे जरी होत असले तरी त्याचा प्रचार मात्र होत नाही ही खंत वाटते. अनेक पर्यटकांना समुद्रकिनारे म्हटले की फक्त गोवा आठवतो, परंतु जर तुम्हाला गोव्यापेक्षा शांत, स्वच्छ आणि सुंदर बीचेस हवे असतील तर एकदा वेळणेश्वर इथे भेट देण्यास काही हरकत नसावी. 'महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या' यादीमध्ये वेळणेश्वरचे जरी नाव असले तरी अजून त्याचा प्रचार व्हायला हवा असे वाटते.



ज्या काळात संपूर्ण जगाच्या निसर्गासमोर एक मोठे आव्हान उभे राहीले आहे त्या काळात सारख्या आर्थिक साम्राज्य असलेल्या मुंबई पासून पाच तासांच्या अंतरावर असलेल्या वेळणेश्वर या छोट्याशा लोकवस्तीच्या गावाने स्वतःचा निसर्ग जपला आहे. आधुनिकतेची भर तर पडणारच; पण प्रदूषण नाही, कल्लोळ नाही, गोंगाट नाही, अजून काय हवे?

आश्चर्य वाटण्याचे अजून एक कारण म्हणजे मुंबई स्थित असलेली हिंदी आणि मराठी फिल्म इंडस्ट्रीचे वेळणेश्वरकडे अजूनही संपूर्णपणे लक्ष नाही. असो, वेळणेश्वरचा निसर्ग एकदा तरी बघून आणि अनुभवून या, एवढ्याच सल्ल्याने थांबतो.

**– प्रा. विनोद एच. वाघ**
विद्या प्रसारक मंडळाचे टी एम सी
विधी महाविद्यालय, ठाणे

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

शहाणा माणूस चुका विसरतो; पण त्याची कारणे नाही!

# खरी कविता कशी असते?

*कविता कशाला म्हणायचं? खरी कविता कुठली? खरा मुक्तछंद कोणता? कवितेचे गुण, गुणधर्म कोणते? अशा अनेक महत्त्वाच्या विषयांवर डॉ. आनंद कुलकर्णी यांचा लेख – संपादक*

सोशल मीडियावर गेलं की कवितांचा अक्षरश: पाऊस पडलेला असतो. असं मुक्तपणे व्यक्त होणं आणि धुवांधार कोसळणं चांगलं असतं. सगळ्यांना व्यक्त व्हायचा अधिकार आहे आणि गरजही आहे. सोशल मीडियाने हे व्यक्त होणं एकदम सहज, सोप्प केलंय. पण असं सगळं वाचून/ऐकून माझ्यासारख्या पामर रसिकाला दडपून जायला होतं. काय आणि किती वाचावं/ऐकावं असं होतं. भेटेल तो कवीच निघतो, बोलेल ती कविताच असते, वाचू ते काव्यच असतं. आपल्याकडे प्रत्येकजण कवी असतोच/असतेच. जणू कविता हा आपला राष्ट्रीय स्वभाव आहे! कवितेची अशी अनिवार ओढ चांगली आहे आणि संवेदनशील माणसाला ती असतेच. सरळ, गद्यात आपल्याला बोलता येतं का नाही असा संभ्रम व्हावा इतके आपण काव्यमय झालेलो आहोत. पण शब्द गोळा करून आणि ओळी जोडून कविता होते का? आणि अशा कवितेला 'वाहवा'ची फुटकळ दाद द्यायची असते? माझा कविता लिहिण्यावर आणि तिला दाद देण्यावर आक्षेप नाही. माझं म्हणणं असं आहे की, यामुळे कसदार कविता आपल्याला ओळखू येत नाहीत, कळत नाहीत. त्यांना कशी दाद द्यायची हे आपल्याला कळत नाही. मग आपण अशा कवितांना टाळत राहतो. खूप काळ पातळ आशय असलेल्या, थेट अंगावर येणाऱ्या, सूचकता घालवून बसलेल्या आणि पूर्णपणे रचनाहीन झालेल्या कवितेतून शब्दांचा मारा झाला की असं होणारच. आपण बोलू आणि लिहू ती कविता होते का? सगळंच गद्य हे कविता आहे का आणि असेल तर मग आपण गद्यालाच कविता मानू! सगळंच फक्त कवितेतूनच मांडायचं असतं का? यातून आणि यामुळे कसदार कविता आपल्या हातून निसटतात; आपण उत्सवी आणि लखलखणाऱ्या कवितांचे भक्त होतो.

आशय हा कवितेचा प्राण असतो. आशय जेवढा कसदार तेवढी कविता असरदार होते. हे म्हणजे मजबूत अंगकाठी आणि संवेदनशील मन यांसारखं असतं. वरून तुम्ही कितीही चकचकीत मुलामा द्या. पण मूळची अंगकाठी म्हणजे आशय नसल्यावर काय होणार? अशा शाब्दिक कॉज्मेटिकचा उपयोग फक्त चमकण्यासाठी आणि इंम्प्रेशन मारण्यासाठी होतो. त्याचा असर होत नाही. आशयाला अधिक उठावदारपणे व्यक्त होण्यासाठी आकृतीबंध लागतो. अर्थात आकृतीबंध तेव्हाच लागतो जेव्हा कवी पारंपरिक कविता प्रकारांमधे लिहित असतो. प्रयोगशील लिहायचं असेल तर आकृतीबंध असलाच पाहिजे असा आग्रह धरता येतं नाही. मग कवीला स्वत:च्या आशयाला व्यक्त करेल असा Form विकसित करावा लागतो.

सूचकता हे कवितेचं महत्त्वाचं वैशिष्ट्य असतं. कविता obvious नसते, नसायला पाहिजे. तिला Face value नसते, ती बोलते ते तिला बोलायचं नसतं. कविता सूचवत असते. हे सूचवण्यासाठी कविता प्रतिमांचा आधार घेते, रूपक आणि प्रतिकांचा वापर करते. आपल्याला हे सूचवणं कळलं पाहिजे. ती जे संदर्भ प्रवाहित करते, जे अनुभव सूचित करते ते आपल्याला पकडता यायला पाहिजेत. असं झालं नाही

तर आपण कवितेच्या सुंदर रचनाबंधात, दिसणाऱ्या आकर्षक सापळ्यात अडकून पडतो. मग आशय बाजूला राहतो आणि आपण 'वरलिया रंगा' भुलून जातो. आणि रचनाही आकर्षक नसेल तर मग आपण निव्वळ टाईमपास किंवा कवीची खोटी वाहवा करतो.

शब्द हे कवितेचं माध्यम असतात. कवी शब्दांशी खेळतच असतो/असते. प्रत्येकाची खेळण्याची तऱ्हा वेगळी असते. ती आपल्याला ओळखता यायला हवी. त्यात शब्दांची निवड आणि प्लेसमेंट महत्त्वाचे. हे चुकलं तर कविता होतं नाही. 'A thing of beauty is a joy forever' ही कविता होते, पण 'A beautiful thing is forever joyful' ही कविता होत नाही. 'The best lack all conviction, while the worst/ Are full of passionate intensity' ही कविता होते, पण 'The best people do not have conviction, while the worst people are full of confidence' ही कविता होत नाही. कविता होण्यासाठी ती obvious नसायला पाहिजे, literal नसायला पाहिजे. ती rhetorical असेल तर ठीक आहे, पण त्यापेक्षा अधिक ती suggestive असली पाहिजे. कारण फक्त rhetorical झाली की कविता अलंकारिक जास्त होते. तिच्यात शब्दांची चमत्कृती जास्त होते, आशय झाकोळतो. उदाहरण म्हणून जॉन मिल्टनची ही प्रभावशाली चमत्कृती बघा (alliteration)–

"Behemoth biggest born of earth upheaved
His vastness: Fleeced the flocks and bleating rose,
As plants."

यांतील 'b' आणि 'f' अक्षर/ध्वनीची पुनरावृत्ती नजरेत भरण्यासारखी आहे. हे वाचून आपण दिपून जातो. पण तीच पुनरावृत्ती

The fair breeze blew, the white foam flew,
The furrow followed free;
We were the first that ever burst
Into that silent sea (S.T. Coleridge)

अशी असेल तर ती आपल्यासाठी लय पकडते आणि सूचकही होते.

आणि पुनरावृत्ती अशी असेल–

I have looked down the saddest city lane.
I have passed by the watchman on his beat
And dropped my eyes, unwilling to explain
(Robert Frost)

– तर ती tongue twister उरतच नाही. यांतील looked आणि lane, eyes आणि explain बघा. इथे पुनरावृत्ती सूक्ष्म आणि तरल होते. चमत्कृती कमी होते, आशय धारदार होतो.

आधुनिक कविता prose सारखी असते, पण prose नसते. त्यात अलंकार कमी असतात, सूचकता अधिक असते. याचा अर्थ ती prosaic, drab आणि unpoetic नसते. ती suggestiveness या अर्थाने काव्यात्म असते. रचना आणि आशयाच्या विविध शक्यता शोधताना ही कविता पारंपरिक निकष नाकारते. मग गेयता, अलंकरण, आकृतीबंध अशा सर्व पातळ्यांवर प्रयोग केलेले असतात. हे सगळं नाकारताना कविता म्हणजे काहीही लिहिणं असं होत नाही. प्रयोगाच्या नावाखाली आशयाचा गळा घोटता येत नाही. याउलट आशय अधिकाधिक कसदार आणि आव्हानात्मक करावा लागतो आणि तो करायचा तर सूचकतेचा index खूप वाढवावा लागतो. आता शब्दांची चमत्कृती मदतीला नसते. त्यामुळे निव्वळ आशयाच्या कसदारपणावर अख्खी रचना निभावून न्यायची असते. हे म्हणजे कशाचीही साथसंगत न घेता फक्त तंबोऱ्यावर षड्ज लावण्यासारखं

असतं. म्हणून अशी प्रयोगशील कविता लिहिणं जोखमीचं असतं.

हे आपण उदाहरण घेऊन बघू. आपण सगळे सध्या मोबाईल addicted आहोत. त्यामुळे आपल्या आयुष्यात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. समजा त्यावर आपल्याला कविता लिहायची आहे. आणि ती आपण अशी लिहिली-

We use mobile phones as if they are our friends.
Mobile phones cause many problems.
We live in the constant state of distraction,
our social life is disrupted.
Our work never ends and expenses never cease.
Mobiles cause accidents and health problems.

हे वाचल्यावर तुम्हाला ही कविता आहे असं वाटलं? नक्कीच नाही. काहीतरी असं आहे जे इथं मिसिंग आहे. काय आहे ते? आशय. या कवितेला आशयच नाही, त्यामुळे ही कविताच नाही. फार तर ते भाषण होईल किंवा निबंधाचा भाग होईल. आता खाली दिलेली रचना वाचा-

Text
Carol Ann Duffy
I tend the mobile now
like an injured bird
We text, text, text
our significant words.
I re-read your first,
your second, your third,
look for your small xx,
feeling absurd.
The codes we send
arrive with a broken chord.
I try to picture your hands,
their image is blurred.
Nothing my thumbs press
will ever be heard.

काय वाटलं वाचल्यावर? ही कविता आहे असं वाटलं ना. कारण काय? त्यात तगडा आशय आहे.'like an injured bird' या दुसऱ्या ओळीपासूनच ही रचना काव्यात्म होते. कारण ती mobile चा literal अर्थ सांगत नाही, तर जखमी पक्ष्याशी तुलना करून अर्थ बदलते. तुमच्या लक्षात आलं का, की यात १४ ओळी आहेत. पण त्या sonnet सारख्या नाहीत. ओळी short, terse आहेत- संक्षिप्त आणि नियंत्रित आहेत. म्हणजे कवीला sonnet चा पारंपरिक रचनाप्रकार नको आहे. तिला आजचा आशय मांडायचाय. मग sonnet असा form घेतं. इथे महत्त्वाचा आहे आशय आणि तो अतिशय प्रभावीपणे आपल्यापर्यंत येतो. या रचनेतील सूचकता तिला दर्जेदार कवितेचं रूप देते.

**- डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे- ४१०५०४

•••

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

कुसंगतीत राहून सतत दुसऱ्याची निंदा करत राहिलात, तर मन कधीच शुद्ध होणार नाही.

# आर्थिक दुर्बलता... व्याख्या, व्याप्ती, व्याकरण

*आर्थिक दुर्बलता... व्याख्या, व्याप्ती, व्याकरण याविषयी लेखकाने आपले मत विशद केले आहे - संपादक*

दुष्काळी जिल्हा जाहीर होणे, आरक्षण आणि आर्थिक दुर्बलता या तीन गोष्टी एकमेकांशी वेगवेगळ्या अर्थाने निगडित आहेत.

पण त्यातले एक महत्त्वाचे साम्य म्हणजे व्याख्या, व्याप्ती आणि व्याकरण या तिन्ही पैलूंवर या तिन्ही गोष्टींत अतिशय घोळ आहे. असा हा घोळ नकळत झालेला आहे की मुद्दामहून घातलेला आहे? हा तर केवळ संवेदनशील विषय आहे, की ज्वालाग्राही पण आहे? हा प्रश्नच आहे!

आज हे पुन्हा एकदा वाटण्याचे कारण म्हणजे अलीकडेच आपल्या देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारकडे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या व्याख्येबद्दल केलेली विचारणा. (आणि याबाबत डॉ. अनिल धनेश्वर यांचा १५ डिसेंबर २०२१ रोजी महाराष्ट्र टाइम्स मध्ये प्रसिद्ध झालेला लेख.)

सध्याची ८ लाख रुपयांची मर्यादा नेमकी कोणत्या निकषांनुसार घालण्यात आली आहे अशी विचारणा करतानाच त्याबाबत काहीशी नाराजीही सर्वोच्च न्यायालयाने प्रदर्शित करताना याबाबतचा खुलासा २६ डिसेंबर पर्यंत करण्यासही सांगितले आहे. या निकषांचा पुनर्विचार करत याबाबत अभ्यास करण्यासाठी समिती नेमण्याची भूमिका केंद्र सरकारने घेतली आहे.

त्यावरून नेहमीच्या राजकीय कुरघोडीच्या पलीकडे नाराजीचा सूर उमटत आहे. कारण याबाबत अनेक प्रकारची, अनेक जागतिक, तसेच राष्ट्रीय संस्थांच्या अद्ययावत आकडेवारी आणि सविस्तर अहवाल सहजासहजी उपलब्ध आहेत. तसेच, सरकारी यंत्रणे अंतर्गत अनेक विभाग याबाबत सतत काम करत असताना आता नव्याने समिती कशाला स्थापना करायला हवी? अशी याबाबत चर्चा आहे.

ही चर्चा पूर्णपणे अनाठायी नसली तरी पूर्णपणे समर्थनीयही नाही. कोणत्याही प्रकारे केंद्र सरकारचे वकीलपत्र घेण्याचा विचार असे म्हणण्यात जरासुद्धा अर्थ नाही.

कारण याची केवळ व्याख्याच नव्हे तर ''व्याख्या (संकल्पना), व्याप्ती (विवरण) आणि व्याकरण (अंमलबजावणी)'' असे तिन्ही घटक महत्त्वाचे ठरतात.

असे म्हणण्याचे पहिले कारण म्हणजे, गेली ४ दशके या ना त्या स्वरूपात आर्थिक धोरण या गोष्टीशी निश्चिती किंवा अंमलबजावणी म्हणून मर्यादित का होईना माझा संबंध आला आहे. त्यातही सेवानिवृत्तीच्या आधीची १० वर्षे आपल्या देशाच्या सर्वच राज्यांत व हजारो राज्य सरकारी उपक्रमांत (State Autonomous Bodies ) राष्ट्रीय निवृत्ती उत्पन्नाच्या (NPS किंवा National Pension Scheme) अंमलबजावणीत माझा यथाशक्ती हातभार, अगदी नोकरीचा भाग म्हणून का होईना, होता. त्यातही आधी 'स्वावलंबन' आणि नंतर 'अटल पेन्शन योजना' (APY) या दोन्ही योजना तर अगदी त्यांच्या सुरवातीपासून ते दोन्ही मिळून सुमारे दोन कोटी सभासद नोंदणी करेपर्यंत मी त्यांच्याशी निगडित होतो.

या काळात कामाचा भाग म्हणून का होईना, विविध राजकीय रंगसंगतीची आपल्या देशातीलच केंद्र सरकारे, अनेक राज्य सरकारे व सरकारी उपक्रम यांचा जो काही मर्यादित का होईना पण अनुभव आला; त्याच्या आधारे इतके नक्कीच म्हणू शकेन की, आपल्या देशात गरिबी ही जरी आर्थिक परिस्थिती-वस्तुस्थिती असली तरी त्याची निश्चिती ही फक्त आर्थिक घटकांवर कधीच अवलंबून नव्हती-

आजही तशी ती अवलंबून नाही-आणि निदान नजीकच्या भविष्यातही तशी ती अवलंबून असण्याची शक्यता नाही.

याबाबतची कारणमीमांसा आणि परिणाम एकमेकांत इतके गुरफटलेले आहेत की विचारता सोय नाही. अशावेळी सरकारी विभागांनी घेतलेल्या भूमिकेला मर्यादा येऊ शकतात. त्यामुळे सरकारी विभागांपेक्षा किंवा आधीच उपलब्ध असणाऱ्या अहवाल-आकडेवारी पेक्षा नव्याने विचार करायची तयारी दाखवलेली बरी असे वाटले असावे...

तो अभ्यास जास्त वस्तुनिष्ठ असेल असे सकृतदर्शनी वाटण्यात फारसे काही गैरही नाही.

असे म्हणत असताना विल्यम नोर्डहाउस (William D. Nordhaus) यांनी केलेली अर्थतज्ज्ञ शब्दाची व्याख्या आठवत राहते.

ते म्हणतात.... ''An Economist is scoundrel who tells you the way things are , than the way you want them to be.''

त्याचबरोबर याची राजकीय-सामाजिक संवेदनशीलता लक्षात घेता तो धोका कोणतेही सरकार सहजासहजी पत्करायला तयार होण्याची आजमितीस शक्यता नाही. ज्या पद्धतीने अगदी अलीकडे शेती विषयक ३ कायदे मागे घेण्याची क्रमवारी घडली हे पाहता तोच धोका पत्करण्याची तयारी कोण दाखवेल? त्यातही उत्तर प्रदेशासहीत ५ राज्यांच्या विधानसभा निवडणुका कोणत्याही क्षणी जाहीर होऊ शकत असताना तर नाहीच नाही. त्यामुळे तरी सरकारी भूमिकेत काही वावगे आहे असे वाटण्यात कितपत वाव आहे ?

अशा अर्थाने ''व्याख्या, व्याप्ती आणि व्याकरण...''

याबाबतचे दुसरे कारण हे पहिल्या कारणाशीच वेगळ्या अर्थाने निगडित असू शकते. अलीकडच्या काळात न्याय- व्यवस्था अतिशय कृतीशीलतेने कार्यरत आहे. अशावेळी आर्थिक दुर्बलते सारख्या नाजूक बाबीला हलकेपणाने घेणे केवळ राजकीय-सामाजिक दृष्ट्याच नव्हे, तर कायदे-पालन व न्याय-व्यवस्था सन्मान या निकषांवरही परवडणारे नाही. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशा किंवा इच्छेनुसार पुनर्विचार आणि तोही त्रयस्थ तज्ज्ञ व्यक्तींच्या माध्यमातून करण्याचा सरकारी पवित्रा सगळ्याच गोष्टींवर उतरणारा ठरतो.

अशा अर्थाने ''व्याख्या, व्याप्ती, व्याकरण...''

तज्ज्ञ समितीच्या माध्यमातून आर्थिक दृष्टीने दुर्बल घटकांची निश्चिती करण्याच्या निकषांची नव्याने पाहणी करण्याचा सरकारी पवित्रा स्वीकारार्ह वाटण्याचे असू शकणारे तिसरे कारण म्हणजे अशा समितीची असू शकणारी सर्वसमावेशकता. कारण यांतले अनेक घटक फक्त केंद्र सरकारच्या अखत्यारीत असतीलच असे नाहीत. त्यात या ना त्या स्वरूपात राज्य सरकारांचा वाटा हा असणारच आहे. आणि हा वाटा निव्वळ अंमलबजावणी स्वरूपाचाच नाही हे नक्की ! राज्या-राज्यांत असणारे आर्थिक-सामाजिक-राजकीय-भौगोलिक फरक लक्षात घेता आणि काही ठिकाणी पोचलेली टोकाची भूमिका लक्षात घेता आर्थिक दुर्बल घटक निश्चिती निकषांबाबत सर्वोच्च न्यायालयातला सरकारी पवित्रा हा पुढच्यास

---

ठेच, मागचा शहाणा स्वरूपाचा असण्याची शक्यता आहेच.

अशा अर्थाने ''व्याख्या, व्याप्ती आणि व्याकरण...''

याबाबतचे असू शकणारे चौथे कारण म्हणजे कोरोनाच्या लाटा व त्याचे विविध प्रकार यांतून निर्माण झालेले अनेक निर्बंध. त्यांतून जे काही अर्थचित्र निर्माण झाले आहे ते दुर्लक्ष करता येण्याजोगे नाही. आर्थिक दुर्बल घटकांच्या निश्चितीच्या निकषांची नव्याने मांडणी करण्याची संधी जर यांतून साधता आली तर ते जास्तच उपयुक्त ठरू शकते. गेल्या दीड-पावणे दोन वर्षांत स्थलांतरीत कामगार (Migration Labour) ते घरून काम (वर्क फ्रॉम होम) हे बदल केवळ काम करण्याच्या जागेपुरेसे मर्यादित राहिलेले नाही. त्यांतून उत्पन्न-खर्च-बचत-गुंतवणुक असा सर्वंकष बदल झाला आहे. त्यातही या चारही घटकांचे प्रमाण-स्वरूप-सातत्य-संरचना यातच बदल झाला आहे. आणि हे जात-धर्म-भूगोल-इतिहास-उत्पन्न याची वर्गवारी पार ओलांडून खरे ठरणारे व ठरत आहे. त्यामुळे एकंदरीतच सगळ्या अर्थकारणी उतरंडीची जर पुनर्रचना करण्याची इच्छा असेल तर आधीच्या विचारसरणीत निव्वळ संख्यात्मक-गुणात्मक जुजबी हलवाहलव करत राहण्यापेक्षा अगदी 'जुने जाऊ दे मरणालागूनी, जाळून किंवा पुरुनी टाका' असे म्हटले नाही तरी नव्या मनूचा नवा शिपाई अशी संधी साधता आली तरी !

अशा अर्थाने ''व्याख्या, व्याप्ती आणि व्याकरण...''

आर्थिक दुर्बल घटक निश्चितीबाबत नवीन समितीच्या माध्यमातून विचार करण्याच्या सर्वोच्च न्यायालयातील सरकारी भूमिकेमागे असू शकणारे संभाव्य पाचवे कारण म्हणजे असंघटित क्षेत्राचा उदय. आपल्या देशात असंघटित क्षेत्र पहिल्यापासून कार्यरत आहे. पण त्याचे झाकोळून जाणे इतके पराकोटीचे आहे की त्याची शास्त्रशुद्ध पद्धतीत माहिती गोळा करण्याची यंत्रणाच नाही. त्यामुळे त्याच्या उत्पन्नाची जिम्मा आणि जमावट आपल्या राष्ट्रीय उत्पन्नात होतच नाही. या परिस्थितीचा पुनर्विचार करण्याची वेळ कोरोना नंतरच्या अर्थकारणाने आणली आहे. संघटीत क्षेत्र सरसकट सर्वांगीण लॉक-डाऊनचा मुकाबला करत असण्याच्या काळात काहीवेळा अपरिहार्यता म्हणून तर काही वेळा संधी म्हणून रोजगार आणि उत्पन्न म्हणून असंघटित क्षेत्र विस्तारत राहिले. आता त्याला डावलून पुढे जाता येणार नाही. याची गणती आणि गणना खरंच करायची असेल तर संपूर्ण आकृतिबंधच सुधारावा लागेल. आणि असा बदल जितका लवकर केला जाईल तितके श्रेयस्कर !

अशा अर्थाने ''व्याख्या, व्याप्ती आणि व्याकरण...''

नव्याने समिती स्थापन करून आर्थिक दुर्बल घटक निकषांचा पुनर्विचार करण्याच्या सरकारी भूमिकेचे समर्थन अजून एका कारणासाठी (सहावे कारण!) करावे लागेल. निदान करता येईल. ते कारण म्हणजे आपल्या राष्ट्रीय अर्थकारणात सेवा क्षेत्राचे प्राबल्य. आपल्या देशात आर्थिक सुधारणांच्या कार्यक्रमांची त्रिदशकपूर्ती साजरी होत असताना आपल्या एकूण राष्ट्रीय ढोबळ उत्पन्नाच्या सुमारे ५८ टक्के वाटा सेवाक्षेत्राचा आहे. मुळातच जागतिक अर्थकारणात सर्वसाधारणपणे कोणत्याही राष्ट्रीय अर्थव्यवस्थेची वाटचाल ही कृषि क्षेत्राकडून उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेकडे होते आणि तिथून नंतर सेवाक्षेत्र प्राबल्याला सुरवात होते. मात्र आपल्या देशात कृषी-क्षेत्राकडून औद्योगिक अर्थव्यवस्थेला जेमतेम भोज्या करून सेवा क्षेत्राकडे वळले गेले. तत्कालीन आर्थिक परिस्थितीत त्याला काही पर्यायही नव्हता. कारण रोजगार संधी आणि त्यामुळे उत्पन्न यांत सेवाक्षेत्रात जितकी जास्त वेगवान आणि जास्त प्रमाणात वाढ होते तितकी कृषी व उद्योग क्षेत्रांत होत नाही. आणि तीही तुलनेने कमी भांडवलात आणि कमी वेळात ! पण सेवाक्षेत्राने

उत्पन्न निर्माण केले तरी त्याचे वितरण फारसे होत नाही. त्याबाबत सेवाक्षेत्र कृषी आणि उद्योग क्षेत्रांच्या तुलनेत वेगळे आहे. त्यातून निर्माण झालेली आर्थिक विषमता कोरोनाने आणखीनच अधोरेखित केली आहे. त्यामुळे आर्थिक दुर्बल घटक निकषांची निश्चिती करत असताना याही मुद्यांचा विचार करता आला तर !

''व्याख्या, व्याप्ती, व्याकरण....'' अशाही अर्थाने.

नवीन समिती स्थापन करून आर्थिक दुर्बल घटक निकष निश्चिती करण्याचे समर्थन अजून एका कारणासाठी (सातवे कारण) करावे लागेल. हे सातवे कारण एका अर्थाने आधीच्या म्हणजे सहाव्या कारणाशी संबंधित आहे. आजपर्यंतच्या आर्थिक दुर्बल घटक निकष निश्चितीमधे काही प्रमाणात पुरुष व स्त्री यांच्याबाबतीत काही वेळा वेगळे निकष व त्यामुळे वेगळा संख्यात्मक निकष लावला जातो. असा फरक जरी सरसकट नसला तरी तो आहे. काही वेळा भौगोलिक, तर काही वेळा क्षेत्रनिहाय कारणाने असा फरक करून स्त्रियांना झुकते माप दिले जाते. यांत काहीही वावगेही नाही. पण आता काही क्षेत्रांत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. विशेषतः सेवा क्षेत्रातील अनेक विभागांत आपापल्या कर्तृत्वाने स्त्रियांनी आपले वर्चस्व निर्माण केले आहे. हे केवळ इतक्यापुरते मर्यादित नाही.

पूर्वीच्या अनेक निकषांत काही राज्यांना त्यांच्या भौगोलिक व वातावरणात्मक घटकांमुळे झुकते माप देण्यात आले आहे. पण अलीकडच्या काळात त्यांत अनेक सकारात्मक बदल झाले आहेत.

अशावेळी बदललेल्या वर्तमानाचेही संदर्भ नव्याने मांडणी करताना विचारात घेतले किंवा घेता आले तर!

अशा अर्थाने ''व्याख्या, व्याप्ती आणि व्याकरण...''

याबाबतचे आठवे कारण म्हणजे काही वर्षांपूर्वीच्या अर्थसंकल्प-पूर्व आढाव्यात (एकोनोमिक सर्व्हे) युनिव्हर्सल बेसिक इन्कम या संकल्पनेची सविस्तर चर्चा करण्यात आली होती. त्याची सांगड आर्थिक दुर्बल घटक निकष निश्चिती निकषाशी घालता आली तर !

''व्याख्या, व्याप्ती, व्याकरण....''

याबाबतचे नववे कारण हे थोडे भविष्यवेधी आहे. आजमितीस आपण तरुणाईची नवलाई (Demographic Dividend) अनुभवत असलो तरी येणाऱ्या काळात आपल्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण वाढते राहणार आहे. या घटकांची पुरेशी, सविस्तर, सातत्यपूर्ण नोंद आजपर्यंतच्या आपल्या आर्थिक धोरणाने घेतली आहे असे म्हणणे निव्वळ धाडसाचे ठरेल. कोरोनाने आणि कोरोनोत्तर अर्थचित्राने हा मुद्दा फक्त सेवानिवृत्त लोकांपुरता मर्यादीत नाही हे विदारकपणे समोर आणले आहे. अशा पार्श्वभूमीवर याही मुद्यांचा विचार करता आला तर श्रेयस्कर !

(हा मुद्दा लिहीत असताना प्राजक्ता पाडगांवकर यांनी लिहिलेल्या आणि राजहंस प्रकाशनाने गेल्यावर्षी प्रकाशित केलेल्या 'सांजवात' या पुस्तकाची खूपच आठवण येते आहे.)

''व्याख्या, व्याप्ती, व्याकरण....''

सध्याच्या राष्ट्रीय तसेच जागतिक पातळीवरील आर्थिक-सामाजिक-राजकीय परिस्थिती आणि अशी परिस्थिती अजून कितीही काळ सुरू राहू शकते याचा विचार केला तर, आर्थिक दुर्बलता ही काहीजणांबाबत अस्थायी स्वरूपाची (अल्पकाळ ते मध्यमकाल अशा अर्थाने) असू शकते. तसेच काहीजणांना त्यांच्या नेहमीच्या आर्थिक उत्पन्नापेक्षा कमी उत्पन्नावर तडजोड करण्याची वेळ येऊ शकते. या दोन्ही स्वरूपाच्या घटकांची तीव्रता गेल्या काही महिन्यांत अतोनात वाढली

(पृष्ठ क्र.१६ वर)

# 'अवघा देहची वृक्ष जाहला' या पुस्तकाचा प्रकाशन सोहोळा

*पर्यावरण दक्षता मंडळ-ठाणे, वीणाताई गवाणकर यांच्या 'अवघा देहची वृक्ष जाहला' या पुस्तकाचा प्रकाशन सोहोळा रविवार दि. ६ मार्च २०२२ रोजी टिटवाळा येथील देवराई जंगल येथे संपन्न झाला. त्या प्रकाशन सोहोळ्याचा वृत्तांत - संपादक*

**'प्रयोजन, व्यासंग व प्रेम या तीन गोष्टींच्या सहाय्याने लोकोत्तर काम करता येतं' : वीणा गवाणकर**

ठाणे येथील पर्यावरण दक्षता मंडळ या पर्यावरणीय संस्थेने टिटवाळा नजीकच्या रूंदे गावाच्या परिसरात काळू नदीच्या काठावर एकेकाळी उजाड झालेल्या ५० एकर वनजमिनीवर वनखात्याच्या त्रिपक्षीय करार योजनेनुसार या वनजमिनीवर स्थानिक वृक्षांची लागवड करून 'देवराई' नावाचा जंगल पुनरुज्जीवन प्रकल्प राबवला आहे. २०१७ पासून ते आतापर्यंत तब्बल २५००० झाडं लावून त्यांची नैसर्गिक पद्धतीने जोपासना केल्याने आज एकेकाळी उजाड असलेल्या वनजमिनीवर दाट जंगल उभं राहिलं आहे. या जंगलात प्रसिद्ध चरित्रलेखिका वीणा गवाणकर यांनी एकोणिसाव्या शतकात वृक्षसंवर्धनाची चळवळ जगभर रुजवणारे रिचर्ड बेकर यांच्या जीवनावर लिहिलेल्या 'अवघा देहची वृक्ष जाहला' या पुस्तकाचे प्रकाशन दिनांक ६ मार्च २०२२ रोजी सकाळी १० वाजता संपन्न झाले. हे पुस्तक राजहंस प्रकाशनाने प्रसिद्ध केलं आहे. थेट जंगलात, निसर्गाच्या सानिध्यात झालेल्या या आगळावेगळ्या प्रकाशन कार्यक्रमात वीणा गवाणकर यांची प्रकट मुलाखत पर्यावरण दक्षता मंडळाचे उपाध्यक्ष डॉ संजय जोशी यांनी घेतली. या मुलाखतीचे शब्दांकन डॉ प्रशांत धर्माधिकारी यांनी केले आहे.

**प्रश्न :** आपण मराठी साहित्याला उत्तमोत्तम चरित्रांची देणगी दिली आहे. 'एक होता कार्व्हर', 'गोल्डा मेयर', 'डॉ. खानखोजे' इत्यादी लोकोत्तर व्यक्तींची चरित्रे लिहावी अशी प्रेरणा आपल्याला कुठून मिळाली?

**वीणाताई :** माझं बालपण ग्रामीण भागात गेलं. लहानपणी आम्ही कंदिलाच्या प्रकाशात अभ्यास करत असू. त्या काळात आजच्यासारखी फेसबुक व्हाट्सएप सारखी समाज-माध्यमे नव्हती. त्यामुळे मी सहाजिकच वाचनाकडे वळले. पुस्तकांच्या वाचनाच्या ओढीने ग्रंथपाल झाले. लहानपणी न्यूनगंड होता तो अभ्यासांती कमी झाला. आपल्याला जे काम आयुष्यात जमलं नाही ते काही लोकांनी करून ठेवलं आहे. निदान ते काम प्रकाशात आणावे म्हणून मी पुस्तक लिहिते. म्हणतात ना Those who can, do. Those who can't, teach.

ज्येष्ठ समीक्षक माधव मनोहर यांनी माझ्या 'एक होता कार्व्हर' या पुस्तकाचं हस्तलिखित वाचलं. तेव्हा ते म्हणाले की, 'या पुस्तकात तत्कालीन समाजाला लागणारा मालमसाला व भानगडी नाहीत. हे पुस्तक कोण वाचेल?' मात्र कार्व्हर खूप यशस्वी झालं आणि या पुस्तकाच्या अनुषंगानं प्रकाशकांना असंख्य पत्रे येऊ लागली. पुढे श्री. माजगावकरांनी या निवडक पत्रांचे पुस्तक प्रकाशित केलं. १९८७ मध्ये 'पर्यायी साहित्य संमेलन' भरलं होतं व त्यामध्ये समीक्षक माधव मनोहर मला भेटले व म्हणाले की, ''मुली तू मला हरवलंस''. तेव्हा मला समजलं की, मी ज्या प्रकारचे लेखन करते आहे त्याचा एक मोठा वाचक-वर्ग मराठी भाषेमध्ये

आहे. मी कुठल्याही प्रकाशकांकडून डेडलाईन घेत नाही किंवा माझा उदरनिर्वाह देखील यावर नाही. त्यामुळे मला आवडेल त्या विषयांवर मी अत्यंत अभ्यास करून पुस्तक लिहिते. मी मराठीत लिहू शकते हा आत्मविश्वास 'एक होता कार्व्हर' ने दिला.

**प्रश्न :** तुमचं लौकिक शिक्षण हे विज्ञान क्षेत्रातलं नसतानाही तुम्ही शास्त्रज्ञांची चरित्रं शब्दबद्ध केली. किंबहुना ती लोकप्रिय झाली. हे आपल्याला कसं जमलं?

**वीणाताई :** मी ग्रंथपाल असल्यामुळे पुस्तकाला हात लावल्या बरोबर मला त्या ग्रंथाचा पोत कळतो. अनेक ग्रंथ हाताळल्यामुळे मला एक वेगळी दृष्टी आहे. मी इंग्रजीत विपुल वाचन केलं. चरित्र-आत्मचरित्र आणि प्रवासवर्णन हे माझे आवडीचे विषय आहेत. त्यामुळे जेव्हा मुली खांडेकर व फडके वाचनात मग्न होत्या तेव्हा मी बखरी वाचत असे. अनेक शास्त्रज्ञांची चरित्र मी त्या काळात वाचली. मला विज्ञान विषय कळत नसला तरी वैज्ञानिकांनी जे कष्ट घेतले ते मला समजतात. त्या अनुषंगाने मी वाचते व वृद्धिंगत झालेल्या व्यासंगामुळे व बहुश्रूत असल्यामुळे ही आत्मचरित्रं मला लिहिता आली.

**प्रश्न :** 'अवघा देहची वृक्ष जाहला' या पुस्तकाचे नायक रिचर्ड बेकर तुम्हाला कधी व कुठे भेटले? त्यांनी घातलेली साद तुम्हाला कशी ऐकू आली?

**वीणाताई :** १९८९ साली मी डॉ. सालिम अली यांचे चरित्र लिहून पूर्ण केलं तेव्हा 'अभिजात निसर्ग सेवक' नावाचं वार्षिक काढणारे पुण्याचे श्री. शशी पटवर्धन मला भेटले व 'आमच्यासाठी काही लिहा' असं म्हणाले. तेव्हा कुठल्या विषयावर लिहावं यासाठी माझा ग्रंथालयीन शोध सुरू झाला. तेव्हा मी रिचर्ड बेकर यांच्यावर एक लेख लिहिला होता. ४ जानेवारी २०२० रोजी अतुल देऊळगावकर यांच्या 'ग्रेटाची हाक तुम्हाला ऐकू येते ना?' या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या वेळी रिचर्ड बेकर यांचा उल्लेख मी कार्यक्रमात केला होता. या कार्यक्रमात अतुल देऊळगावकर यांना बेकर विषयी विचारलं तेव्हा समजलं की, त्यांना बेकर ठाऊक नाहीत. मग बेकर यांचा परिचय मराठी वाचकांना करून देण्याचं मी निश्चित केलं. 'सहारा चालेंज' नावाचं बेकर यांचे पुस्तक वाचत असताना जाणवलेला थरार आजही स्मरणात आहे. रिचर्ड बेकर यांच्या कार्याचा वेगळेपणा माझ्या मनात कोरला गेला होता. त्यांचे वृक्षप्रेम, वृक्षशेती, वृक्ष लागवडीच्या प्रचारार्थ आणि प्रसारार्थ आयुष्यभर त्यांनी केलेले प्रयत्न, बेसुमार जंगलतोडीमुळे भोगावी लागणारी संकटं, मानवनिर्मित वाळवंट, त्यांचे दुष्परिणाम, त्यावर त्याने सुचवलेले उपाय, वाळवंट अडवण्यासाठी हरित पट्टा उभारण्यासाठीची त्यांची धडपड, खिसे रिकामे असूनही जागतिक जंगल दौरे आखून ते पार पाडणारा, वृक्ष प्रेमाचा, वृक्ष मैत्रीचा बीज पेरत राहणारा हा अवलिया डोक्यात ठाण मांडून होता. शालेय विद्यार्थ्यांसमोर किंवा पर्यावरण प्रेमींसमोर बोलण्याची संधी मिळाली की मी न चुकता रिचर्ड बेकर आणि त्यांचं 'वृक्षनृत्य' यांची माहिती सांगत असे.

**प्रश्न :** हे पुस्तक लिहिताना लंडन येथील डॉ. प्रेरणा तांबे यांची आपल्याला मोलाची मदत झाली असं आपण पुस्तकाच्या मनोगतात लिहिलं आहे. आम्हाला डॉ. प्रेरणा तांबे यांच्या या पुस्तक निर्मिती मध्ये झालेल्या योगदानाबद्दल जाणून घ्यायला आवडेल.

**वीणाताई :** रिचर्ड बेकर यांच्यावरील पुस्तक लिहायचं ठरल्यानंतर माझ्याकडे अत्यंत मोजके संदर्भ ग्रंथ उपलब्ध होते. मुख्य प्रश्न होता तो म्हणजे १९८९ साली बेकर यांच्यावरील लेख लिहिण्यासाठी वाचलेली पुस्तकं परत मिळवायची कशी? मी मेझॉनवर पुस्तकांचा शोध घेतला. माझी फेसबुक वर मैत्रीण असलेल्या लंडनस्थित प्रेरणा

तांबे या तरुण मैत्रिणीला मेसेज पाठवून मी बेकर यांच्यावरील पुस्तकांची गरज कळवली. दरम्यान कोरोनामुळे भारत व इंग्लंड या दोन्ही देशांमध्ये लॉकडाऊन चालू झाला होता. त्यामुळे पुस्तकं लंडनहून पोस्टाने निघायला खूप काळ गेला. मी नाद सोडून द्यावा या विचारात होते. तसं प्रेरणाकडे बोलले आणि तासाभरात प्रेरणाने सांगितलं की, मला Sahara Challenge, Land of Tane, Green Glory , Dance of the Tree, Man of the Trees ही पुस्तकं मिळताहेत. चालतील का? मी पोस्टाचा माझा अनुभव तिला कळवला व ही पुस्तकं पोस्टाने पाठवू नको असं कळवलं. माझी अडचण लक्षात घेऊन प्रेरणा तांबे यांनी एका एका पुस्तकाच्या पानांची छायाचित्र काढून मला व्हाट्सअप वर पाठवली. ती पानं मोबाईलच्या छोट्या पडद्यावर वाचताना मला त्रास होऊ नये म्हणून त्या पानांचे प्रिंटआउट काढून त्याचे स्पायरल बाइंडिंग करून माझ्या मुलाने अनूपने माझी सोय केली. महत्त्वाचं 'सहारा चालेंज' चे पुस्तक असं मिळाल्यावर माझा हुरूप वाढला. लॉकडाऊनचा काळ सत्कारणी लागला. आजवर न पाहिलेल्या, न भेटलेल्या या तरुण मैत्रिणीमुळे मी बेकर चरित्रासाठी साहित्य मिळवू शकले. तिचं मोठं ऋण आहे माझ्यावर. मी प्रेरणाला विचारलं, 'काही ओळख नसताना तू मला एवढी आणि अशी मदत का करत आहेस?' ती म्हणाली २००६-०७ सालात मी अत्यंत त्रस्त आणि निराश मन:स्थितीत असताना तुमची 'रोझलिंडफ्रेंक्लिन' आणि 'लिजमाईटनर' ही दोन पुस्तकं माझ्या वाचनात आली व मी नैराश्य झटकून जोमाने उभी राहिले. आज मी यशस्वी झाले आहे ती तुमच्या त्या दोन पुस्तकांनी दिलेल्या प्रेरणेमुळे. तुमचं ऋण फेडण्याची संधी तुम्ही मला दिलीत'. अशी माणसं आपल्या आयुष्यात येणं हा दुर्मीळ योग म्हटला पाहिजे.

**प्रश्न :** आपल्या पुस्तकामध्ये रिचर्ड बेकर यांच्या वृक्षनृत्य या अनोख्या विषयाबद्दल तुम्ही विस्तारानं लिहिलं आहे. आम्हाला याबद्दल अधिक जाणून घ्यायला आवडेल.

**वीणाताई :** रिचर्ड बेकर हे ब्रिटिश राजवटीतील केनिया मध्ये वन खात्यातील नोकरी निमित्ताने गेले होते. वृक्ष लागवडीमुळे ब्रिटन व इतर देशांना गरजेच्या लाकडाचा अव्याहत पुरवठा होत रहावा अशा व्यापारी उद्दिष्टातून बेकर यांनी सुरुवातीला वृक्ष लागवड कार्यक्रमाला केनियामध्ये सुरुवात केली. परंतु नंतर त्यांना या वेडाने झपाटून टाकले. वेगाने होणाऱ्या वृक्ष विनाश आणि वाढते वाळवंटीकरण रोखण्यासाठी झाडं लावली पाहिजेत, जपली पाहिजेत या ध्यासाने बेकर यांनी जन्मभर मनापासून काम करत बदल घडवण्याचा प्रयत्न केला. केनिया मधील टोळीनायकाशी बोलताना त्यांना समजलं की, त्या आदिवासी समाजामध्ये जीवनातील प्रत्येक गोष्टीसाठी नृत्य आहे. मात्र झाड लावण्यासाठी नृत्य नाही. या नृत्यप्रिय समाजामध्ये झाड लावण्यासाठी नृत्य नसण्यामागचं कारण म्हणजे झाडं ही देवानं लावायची असतात, माणसांनी नाही हा समज प्रचलित होता! या समाजाचा अभ्यास करताना रिचर्ड बेकर यांनी आफ्रिकन तालवाद्य यांचा अभ्यास केला व झाडे लावण्यासाठी एक आगळावेगळा नृत्यप्रकार निर्माण करण्यासाठी एक नृत्य स्पर्धा आयोजित केली. या स्पर्धेसाठी ३००० प्रवेशिका आल्या. सहाजिकच तत्कालीन ब्रिटिश राज्यसत्ता इतके सारे आफ्रिकन एकत्र येणार म्हणून हादरल्या होत्या; मात्र वृक्षलागवडीसाठी नृत्याचा वापर करणाऱ्या या विलक्षण कल्पनेतून वृक्ष नृत्याची संकल्पना समाजात रूढ झाली. रिचर्ड बेकर यांनी वसाहतवादी भूमिकेच्या बाहेर जाऊन 'सर्व मानव एक आहोत' व 'सर्व सृष्टी एक आहे' या दृष्टीने निसर्ग संवर्धनाचे काम केले. वसाहतवादी स्वार्थीवृत्तीपासून संपूर्ण विश्व हे एक कुटुंब आहे या बेकर यांच्या मनाच्या अवस्थेपर्यंत झालेला हा प्रवास थक्क करणारा आहे. १९२२ मध्ये

सुरू झालेल्या वृक्ष नृत्याला २०२२ म्हणजे या चालू वर्षात शंभर वर्ष पूर्ण झाली आहेत. हा एक वेगळा योग म्हटला पाहिजे

**प्रश्न :** रिचर्ड बेकर भारतात आले होते. भारतातील पर्यावरण विषयक चळवळीवर त्यांच्या प्रभावाबद्दल आम्हाला जाणून घ्यायला आवडेल.

**वीणाताई :** रिचर्ड बेकर भारतात आले तेव्हा देशाचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू होते. त्यांच्या भेटीत नेहरूंनी बेकर यांना आपण 'सहारा व्हिक्टरी' हे त्यांचं पुस्तक वाचलं आहे असं सांगितलं. त्यानंतरच्या काळात केरळमधे प्रस्तावित सायलेंट व्हॅली प्रकल्पामुळे तेथील अतिशय समृद्ध जैव विविधता मोठ्या प्रमाणात नष्ट होणार होती. रिचर्ड बेकर यांनी हा प्रकल्प होऊ नये यासाठी सुरू असलेल्या आंदोलनात सक्रिय भाग घेतला होता. तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी बेकर यांना 'हा प्रकल्प सरकारतर्फे रद्द करण्यात येईल' असं आश्वासन दिलं आणि पुढे तो प्रकल्प रद्द झाला. 'चिपको चळवळीचे' अध्वर्यू सुंदरलाल बहुगुणा यांचेही त्यांचे घनिष्ठ संबंध होते. जागतिक पातळीवर सुरू असलेल्या वृक्ष संवर्धनाच्या चळवळीमुळे भारतातील चिपको चळवळ जगभर अधिक नावाजली गेली. रिचर्ड बेकर यांच्या 'इंडिजिनसट्री' या पुस्तकामध्ये भारतातील वृक्षांवर एक स्वतंत्र प्रकरण आहे. पनवेल जवळ तारा या गावी 'रिचर्ड बेकर स्मृतीवन' देखील उभारलेले आहे.

**प्रश्न :** आतापर्यंत 'एक होता कार्व्हर' या पुस्तकाच्या पंचेचाळीस आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. मराठी साहित्यातील हा विक्रमच म्हणायला हवा. या पुस्तका संदर्भात बोलण्यासाठी आपल्याला अमेरिकेतील विद्यापीठाने नुकतंच आमंत्रित केलं होतं. त्याबद्दल विस्ताराने सांगा.

**वीणाताई :** भारताच्या स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी आपण सध्या साजरी करत आहोत. त्यानिमित्ताने अमेरिका व भारताच्या वकिलातीमध्ये काही संयुक्तपणे कार्यक्रम करावा अशी चर्चा सुरू होती., त्यावेळी तेथे काम करणाऱ्या एका मुलीने 'एक होता कार्वर' बद्दल अमेरिकन प्रतिनिधीला सांगितले. एका कृष्णवर्णीय अमेरिकन वैज्ञानिकाच्या चरित्राच्या ४५ आवृत्त्या प्रकाशित होतात व अनेक पिढ्या यामधून प्रेरणा घेतात ही कल्पनाच त्यांना नवीन वाटली व त्यांनी मला व्याख्यानासाठी बोलावले.

'एक होता कार्व्हर' हे माझं अत्यंत लोकप्रिय पुस्तक आहे. या पुस्तकाने अनेक जणांना प्रेरणा दिली आहे. या पुस्तकातून प्रेरणा घेऊन अनेकांनी विधायक काम उभं केलं आहे. यापैकीच एक काम श्री. विलास शिंदे यांनी सह्याद्री फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या माध्यमातून नाशिक येथील दिंडोरी येथे काम उभे केले आहे. या कामात १५००० शेतकरी सभासद असून पंचवीस हजार एकर क्षेत्रावर ही शेती करण्यात येते . यावर्षी त्यांची पाचशे तीस कोटींची उलाढाल आहे. एका पुस्तकाने प्रभावित होऊन एवढं मोठ काम उभं राहणं हा लेखक म्हणून माझ्यासाठी सन्मानाचा क्षण आहे. याच पुस्तकातून प्रेरणा घेऊन कोकणामध्ये 'कार्व्हर डे केअर सेंटर' संदीप परब यांनी सुरू केले आहे. अशी अनेक उदाहरणं देऊन मी ते व्याख्यान दिलं.

**प्रश्न :** डॉ कार्व्हर, डॉ खानखोजे, रिचर्ड बेकर या तिघांनीही निसर्ग, शेती, वृक्षसंवर्धन या कार्यात स्वत:ला वाहून घेतलं होतं. त्यांच्याबद्दल लिहिताना त्यांच्या कार्यपद्धतीत काही समान सूत्र आढळलं, की काही भिन्नता होती?

**वीणाताई :** मी लिहिलेल्या चरित्रामध्ये एक समान धागा मला दिसतो तो म्हणजे या चरित्रांचे नायक समाजाला शिव्या न देता आपलं प्रवाहाविरुद्ध काम

करत शून्यातून विश्व निर्माण करतात. रुळलेली वाट न घेता नवीन कार्यक्षेत्र निवडून त्यामध्ये प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता काम उभं करतात. खलील जिब्रान याने एके ठिकाणी म्हटले आहे की, 'तुमच्या आयुष्याला काही प्रयोजन असले पाहिजे; त्या प्रयोजना मागे व्यासंग असला पाहिजे व जे काम करत आहात त्याबद्दल कमालीचं प्रेम असलं पाहिजे.' प्रयोजन, व्यासंग व प्रेम या तीन गोष्टींनी लोकोत्तर काम करता येतं हे मी लिहिलेल्या चरित्रां मधील समान सूत्र आहे

**प्रश्न :** रिचर्ड बेकर यांच्यावरील पुस्तकामध्ये आपण प्रख्यात इंग्रजी नाटककार जॉर्ज बर्नाड शॉ व बेकर यांच्यातील पत्रव्यवहारा संदर्भात लिहिलं आहे त्याबद्दल आम्हाला सांगा.

**वीणाताई :** रिचर्ड बेकर हे वृक्षसंवर्धनासाठी लागणाऱ्या कामासाठी निधी उभा करत असत. या कामासंदर्भात त्यांची एकदा ज्येष्ठ नाटककार जॉर्ज बर्नाड शॉ यांची भेट झाली. शॉ त्यांना म्हणाले की, 'मी ज्या झाडाच्या बिया लावतो ते झाड उगवतच नाही. मला काही शाप आहे असे वाटते.' यावेळी रिचर्ड बेकर त्यांना म्हणतात की, 'मी आपल्याला उ:शाप देतो की, 'आपल्याला पाईन वृक्षासारखे आयुष्य, ओक वृक्षासारखे आरोग्य व रेडवूड वृक्षासारखे सामर्थ्य लाभो'. अर्थात वृक्षांच्या गुणवैशिष्ट्यांची उपमा देऊन जॉर्ज बर्नाड शॉ यांना बेकर यांनी दिलेला आशीर्वाद म्हणजे आपल्यासारख्या वृक्षप्रेमींसाठी देखील उद्‌बोधक आहे.

**प्रश्न :** याला समांतर असे कोणते भारतीय वृक्ष आहेत? या वृक्षांचा असा आशीर्वाद आम्हा सर्वांना द्यावा अशी मी विनंती करतो.

**वीणाताई :** भारतीय परिप्रेक्षात हा आशीर्वाद द्यायचा असेल तर आपण म्हणू शकतो की 'आपणा सर्वांना वडाचे आयुष्य, पिंपळाचं आरोग्य व औदुंबराचं सामर्थ्य लाभो.'

उपस्थित सर्व वृक्षप्रेमी, निसर्गप्रेमी, पर्यावरण संरक्षक आणि संवर्धक, वीणाताईंनी वृक्षांच्या सान्निध्यात आपल्या सर्वांना हा बहुमोल आशीर्वाद दिला आहे ही मला वाटतं आपल्या सर्वांच्या भाग्याची घटना आहे. हा आशीर्वाद आपण कार्यरत असताना सदैव आपली सोबत करेल याची मला खात्री आहे.

धन्यवाद

**मुलाखतकार : डॉ संजय जोशी**

**शब्दांकन : डॉ प्रशांत धर्माधिकारी**

•••

---

(पृष्ठ क्र.११ वरून - **आर्थिक दुर्बलता.... व्याख्या, व्याप्ती, व्याकरण)**

आहे. आणि अशी उदाहरणे स्थल-निरपेक्ष, वय-निरपेक्ष, क्षेत्र-निरपेक्ष आहेत. यांचाही विचार प्रस्तावित समितीच्या रडारवर आणता आला तर!

''व्याख्या, व्याप्ती आणि व्याकरण...''

'आर्थिक दुर्बल घटक - निकष, निश्चिती' हे प्रकरण म्हणून तर ''व्याख्या, व्याप्ती आणि व्याकरण'' अशा तिन्ही प्रकारे......

**- चन्द्रशेखर टिळक**

सी -४०२. राज पार्क,

मढवी बंगल्याजवळ,

राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व )

पिन - ४२१२०१

भ्रमणध्वनी - ९८२०२९२३७६

•••

---

हल्ली कमालीच्या स्पर्धेत माणसाला 'स्व'च्या पलीकडे काही अस्तित्व असते ही जाणीवच उरलेली नाही.

# सुयोग्य पालकत्व

*मुलांना उत्तमप्रकारे वाढविणे ही पालकांची मोठी जबाबदारी असते. याची जाणीव करून देणारा मार्गदर्शक लेख – संपादक*

आजची पिढी बिघडते; त्यांना नकार, अपयश सहन होत नाही, हे सहन न झाल्यामुळे ऐन तारुण्यात आज मुलं आत्महत्या करत आहेत किंवा निराशेच्या गर्तेत लोटली जात आहेत. ह्याला जबाबदार कोण आहे? ह्या आधीची पिढी आताच्या पिढीपेक्षा सगळ्याच बाजूने पिचलेली होती. सुखवस्तू कुटुंब फार कमी होती, अतोनात संघर्ष होता, तरीही त्या पिढीने स्वतःचे पाय खंबीर रोवून आयुष्य मार्गी लावलं. मग आता असं का घडतंय? ह्याचं अनेक कारणांपैकी एक कारण आहे की, कुठेतरी आताच्या पिढ्यांना वाढवताना पालक चुकताय्‌त. आजचे पालक आपल्या मुलाला / मुलीला सगळंच मिळावं ह्यासाठी अतोनात अट्टाहास करताना दिसतात. ह्यामुळे, ज्या मुलांना बालपणापासून सगळंच मिळत जातं, त्यांना पुढे जाऊन नकार सहन होत नाही. पालकांनी हे लक्षात घेतलं पाहिजे की, मुलांना आपण आयुष्यभर सगळं पुरवू शकणार नाही. त्यांना बाहेरच्या जगाचा सामना एकट्याने करायचा आहे. त्यासाठी त्यांना लाडावून ठेवण्यापेक्षा खंबीर बनवण्याची नितांत आवश्यकता आहे.

कालच्या आमच्या इमारतीच्या पूजेच्या निमित्ताने एक-दोन प्रसंग बघायला मिळाले. पालक किती चुकताय्‌त ह्याचं खरं तर आश्चर्यच वाटलं.

लहान मुलांच्या संगीत खुर्चीला सुरुवात झाली आणि पहिल्या फेरीतच बाद झालेल्या मुलाने भोकांड पसरलं. पालकांनी मुलाला समजवायचं राहिलं बाजूला, पण 'तो लहान आहे, म्हणून मीच त्याला घेऊन जाऊ का?' असे आईने विचारले आणि आयोजकांनी सुद्धा संमती दिली. ह्यानंतरचा प्रकार बघण्यासारखा होता. सगळ्याच मुलांना घेऊन पालक धावत होते. स्पर्धा नक्की पालकांची, की मुलांची? हेच कळेनासं झालं! आपल्याच मुलाने / मुलीने जिंकले पाहिजे, हा किती विकृत अट्टाहास! बरं त्यांना प्रोत्साहान देणे इथपर्यंत ठीक, पण थेट त्यांच्यासाठीच खेळणे म्हणजे अजबच प्रकार. हसावं की रडावं!

आपल्या पाल्याने सगळ्यांमध्ये सहभागी व्हावे, मनमोकळे खेळावे, बागडावे की जन्मापासूनच पालकांच्या कुबड्यांवर जगावे? स्पर्धा कशीही करून जिंकायचीच, हा किती चुकीचा बोध ह्यातून मुलं घेतील? स्पर्धा पूर्ण ताकदीने खेळून जिंकणं ह्यालाच महत्त्व असलं पाहिजे आणि हरलोच तर पुढच्या वेळेस सुधारावे. स्पर्धा स्वतःशीच केली पाहिजे, कालच्यापेक्षा आज मी अजून नवीन काही शिकलोय, सुधारलोय हे जास्त महत्त्वाचं आहे. ह्या अशा पालकत्वामुळे मुलांना हे सगळं कळणं अशक्यच आहे.

प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक स्पर्धेमध्ये माझं मूल अग्रगण्यच असायला हवं, त्यासाठी ते म्हणेल ते आणून द्यायला आणि म्हणेल तसं पालक अगदी तयार असतात. त्यांच्या लहान उमलण्याच्या वयात त्यांच्यावर अशा स्पर्धा लादणे हे अन्यायकारक आहे. आपलं मूल सगळ्यात Best आहे, ह्यासाठी पालकांमध्ये जणू स्पर्धा लागलेली दिसते.

अजून एक प्रकार हल्ली सर्रास बघायला मिळतो. तो म्हणजे लहान मुलं आपल्या आईवडिलांना नुसत्या

orders देत असतात, अतोनात हट्ट करत असतात, आपला एकही शब्द खाली पडू न देणे, हेच जणू आईवडिलांचं आयुष्यात एकमेव ध्येय आहे असे मुलांना वाटतं!

दोन्ही पालकांची उत्तम असणारी नोकरी किंवा व्यवसाय त्यामुळे मिळत असलेला कमी वेळ, तसेच विभक्त कुटुंब पद्धती ह्यामुळे बहुतांशी घरांमध्ये एकच मूल असतं आणि अशाच वातावरणामुळे मुलांचे अतोनात लाड केले जातात. बहुतांश पालक, दोघेही उत्तम नोकरी किंवा व्यवसाय करत असतात. अशावेळेस मुलांना द्यायला वेळ त्यांच्याकडे अजिबात नसतो. मग ही कसर भरून काढण्यासाठी weekend plans , मॉल्स, मूव्ही, outings हे सगळं केलं जातं, पण ह्या सगळ्यांमध्ये खरंच आपल्या पाल्याची मानसिक आणि भावनिक वाढ होत आहे की नाही, हे बघितलंच जात नाही.

खरंतर, गर्भधारणा झाल्यापासून मूल जन्माला येईपर्यंत आणि मूल जन्मल्यापासून अगदी ७ ते ८ वर्षांपर्यंत करण्यासारखं बरंच काही आहे; ज्यामुळे आपल्या मुलाची शारीरिक, मानसिक, भावनिक व सामाजिक जडणघडण उत्तम होऊ शकेल. आपल्या पाल्याला देशाचे सुजाण व कर्तव्यदक्ष नागरिक बनवणे हे आपले कर्तव्य आहे. मातांना वेळप्रसंगी करिअरमध्ये किमान पाच वर्ष ब्रेक घेणे गरजेचे आहे. आपल्या मुलांना ही अमूल्य ५ ते ७ वर्ष देणे गरजेचे आहे. त्यासाठी सामाजिक स्तरावर देखील प्रयत्न/चळवळ होणे अपेक्षित आहे. जेणेकरून स्त्रिया आपल्या मुलांबरोबर ती महत्त्वाची वर्षे राहू शकतील. पण त्यानंतर त्यांचे करिअर कायमचे संपुष्टातही येणार नाही.

फक्त आपल्या मुलाबरोबर घरी राहणे इतकेच पुरेसे नाही, पण तो वेळ सत्कारणीही लावायला हवा.

आपल्याकडे भरपूर पैसा आहे. आपण कितीही बिलं भरू शकतो; तरीही आपण वीज, पाणी इ. संसाधने जपूनच वापरायला हवी. वीज, पाणी, अन्न वाया घालवू नये. समाजात आपल्यापेक्षा जो उपेक्षित वर्ग आहे, त्याला आपल्यापरीने जमेल ती मदत करावी. आपल्या घरात कामाला येणाऱ्या मदतनीस यांचा आदर करावा, आपल्याला जे काही आज सहज उपलब्ध आहे त्यासाठी मनात कृतज्ञ भाव असावा. ह्या आणि अशा अनेक महत्त्वपूर्ण जाणिवा बालकांमध्ये ८ वर्षांपर्यंत दृढ करायला हव्यात. हे सगळं करताना आपले आपल्या पाल्याबरोबरचे संबंध हे मैत्रीपूर्ण आणि पूर्णतः विश्वासाचे असणे पुढील वाटचालीसाठी अत्यावश्यक आहेत.

बालसंगोपनावर आज अनेक माध्यमांद्वारे भरपूर साहित्य उपलब्ध आहे. पण प्रत्येक मूल हे वेगळं असतं. त्यामुळे कुठल्याही बालसंगोपनाचा धडा जसाच्या तसा आपल्या मुलाला लागू करता येणार नाही हे पालकांनी लक्षात घ्यायला हवं.

कामाच्या ठिकाणी जसे आपण एखादे project / प्रकल्प अनेकजण एकत्र येऊन शर्थीचे प्रयत्न करून यशस्वी करतो त्याचप्रमाणे, आपल्या मुलाला उत्तमप्रकारे वाढवणे, हा आईवडिलांसाठी एक पूर्णवेळ प्रकल्प आहे असा दृष्टीकोन ठेवून, त्यावर व्यवस्थित अभ्यास करून, आपापसात चर्चा व विचारविनिमय करून जर आपल्या मुलाला वाढविले गेले तर येणारी पिढी ही निश्चितपणे उत्तम माणूस व देशाचे सुजाण नागरिक म्हणून निपजेल ह्यात शंका नाही. सर्वांना सुयोग्य पालकत्वासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

(हा लेख एक पालक म्हणून आलेल्या अनुभवांतून लिहिला आहे, तरीही कोणालाही दुखावण्याचा हेतू नाही. सदर लेखातील मतं ही माझी वैयक्तिक आहेत.)

**– सौ. रश्मी रोहित नाटेकर**
वि.प्र.मं.चे ठा.म.पा. विधी महाविद्यालय, ठाणे

# भारतीय खगोलशास्त्राचा उगम व विकास

*दिनांक १४ एप्रिल २०२२ हा स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडेकर यांचा अठरावा स्मृतिदिन. त्यानिमित्ताने ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळ ठाणे यांच्या वतीने थोरले बाजीराव पेशवे सभागृहामध्ये टाटा मूलभूत संशोधन संस्थेतील ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. मयंक वाहिया यांचे 'भारतीय खगोलशास्त्राचा उगम व विकास' विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानाचे वार्तांकन डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी केले आहे – संपादक*

**आपल्या परंपरेतील खगोलशास्त्रीय ज्ञानाचे दस्तऐवजीकरण गरजेचे : डॉ मयंक वाहिया**

दिनांक १४ एप्रिल २०२२ हा स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडेकर यांचा अठरावा स्मृतिदिन. त्यानिमित्ताने ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळ ठाणे यांच्या वतीने थोरले बाजीराव पेशवे सभागृहामध्ये टाटा मूलभूत संशोधन संस्थेतील ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. मयंक वाहिया यांचे भारतीय खगोलशास्त्राचा उगम व विकास विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू उलगडून दाखवले. 'त्यांचा साधेपणा, कामाबद्दलची निष्ठा आणि सेवापरायणता हे गुण लक्षणीय होते' असे डॉ बेडेकर म्हणाले. 'प्राध्यापकांनी आपल्या विद्यार्थ्यांमध्ये शिस्त आणि आपल्या कामाबद्दलची निष्ठा हे गुण रुजवले पाहिजेत. चार भिंतींच्या पलीकडे असलेले शिक्षण देऊन विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केलं पाहिजे. विद्या प्रसारक मंडळाचा शिक्का घेऊन विद्यार्थी बाहेर पडणार असल्यामुळे त्यांच्यामध्ये हे सद्गुण विकसित झालेच पाहिजे; यासाठी शिक्षकांनी कटाक्षाने लक्ष घालावे' असे डॉ. बेडेकर म्हणाले.

'भारतीय खगोलशास्त्र उद्गम आणि विकास' या विषयावर व्याख्यान देताना डॉ. मयंक वहिया यांनी सर्वप्रथम स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या कर्तृत्वाला वंदन करत त्यांच्या संस्था उभारणीमध्ये केलेल्या कामाचे विशेष कौतुक केले. 'एक वैद्यकीय व्यावसायिक एका रुग्णाला बरा करू शकतो मात्र एक शिक्षक संपूर्ण पिढीला शिक्षित करत असतो. त्यामुळे विद्या प्रसारक मंडळातील शाळा व महाविद्यालये सुरू करण्याचे द्रष्टेपण स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडेकरांकडे होते' असे ते म्हणाले.

एखाद्या संस्कृतीचे जर साकल्याने आकलन करायचे असेल तर खगोलशास्त्रीय आणि स्थापत्य शास्त्रीय पुराव्यांच्या माध्यमातून ते अधिक चांगल्या पद्धतीने करता येते. हडप्पा मोहंजोदाडो संस्कृतीचे उदाहरण देऊन ते म्हणाले की, 'एखाद्या संस्कृतीचा बौद्धिक व सांस्कृतिक विकास जेव्हा होतो तेव्हा त्यामध्ये साहित्य,

धर्म, मिथके, गणित व खगोल इत्यादी शास्त्रांच्या माध्यमातून तो विकास होत असतो. होमो निअँडरथल अर्थात आदिमानवाला देखील पृथ्वी ही आपली माता आहे; आकाशातून पाणी येतं; तसेच चंद्र, वारा, वादळ, सूर्य इत्यादी गोष्टींचे पुरेसे ज्ञान होते. हंपी येथे एका खडकावर कोरलेलं ग्रहांचे एक विलक्षण चित्र संशोधकांना सापडलं व त्यातून तत्कालीन समाजामध्ये ग्रहांची माहिती होती असे आपल्याला म्हणता येईल.

व्यक्तीचा व परिणामी संस्कृतीचा बौद्धिक विकास होताना स्थापत्यशास्त्र, धर्म, विज्ञान आणि खगोलशास्त्र यांचा विशेष उल्लेख करायला हवा. खगोलशास्त्राचा अभ्यास तत्कालीन पुरोहित वर्ग, खगोलशास्त्रज्ञ, कलाकार, शेतकरी, प्रवासी आणि पंचांगकर्ते यांनी केला होता. साधारणतः तेराव्या शतकापर्यंत भारताच्या किनाऱ्यालगत राहणाऱ्या जमातींमध्ये खगोलशास्त्रीय नकाशे व गणिती कोष्टकांचे विशेष ज्ञान होते. सूर्याचा कुठल्या नक्षत्रात उदय होतो; गुढीपाडव्याच्या वेळेला कुठले नक्षत्र असते इत्यादी गोष्टींचा अभ्यास तत्कालीन समाजाने केला होता. एक दगडाची किंवा लाकडाची काठी जमिनीमध्ये पुरून वर्षभर तिची सावली कुठे व कशी पडते याचा अभ्यास करून वेळा व खगोलशास्त्रीय संकल्पनांचा अभ्यास तत्कालीन समाज करत असे . याचा उपयोग मंदिर निर्माण करणारे स्थापत्यशास्त्रज्ञ करत असत.

त्यानंतर डॉ मयंक यांनी खगोलशास्त्राच्या विकासाचे चार टप्पे सांगितले. पहिल्या टप्प्यात लोकांना सूर्य हा ऊर्जेचा स्रोत आहे; पाऊस, सूर्य आणि आकाश हे जीवन देणारे घटक आहेत हे माहिती होतं. काश्मीर मध्ये सापडलेल्या काही खडकांवरील चित्रांमध्ये दोन सूर्य काढल्याचा संदर्भ आहे. यावरून तेव्हा काहीतरी वेगळी खगोलशास्त्रीय परिस्थिती उद्भवली होती असा तर्क काढण्यास जागा आहे असे ते म्हणाले.

खगोल शास्त्राच्या विकासाचा दुसरा टप्पा म्हणजे लोकांनी खगोलशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी मोठ्या दगडी वास्तूंचे निर्माण केले होते. सूर्याच्या परिवलनाचे अध्ययन करण्यासाठी व अचूक नोंदी घेण्यासाठी या दगडी वास्तू उभारण्यात आल्या होत्या. याच काळात वैदिक साहित्यामध्ये संहिता आणि वेदांग ज्योतिष यांचा विकास झाला. ऋग्वेदातील वेदांग ज्योतिषात म्हटल्याप्रमाणे य

यथा शिखा मयूराणाम्  
नागानाम् मणयो यथा ।  
तदवद् वेदांगशास्त्राणाम्  
गणितम् मूर्धनिस्थितम ।।

ज्याप्रमाणे मोराच्या डोक्यावर तुरे असतात व नागाच्या डोक्यावर मणी असतो, त्याप्रमाणे वेदांग शास्त्रांचा अभ्यास करण्यासाठी गणित हे मूर्धन्य स्थानी होते असा उल्लेख आहे.

लोकमान्य टिळकांनी आपल्या 'ओरायन' या ग्रंथामध्ये 'संपात बिंदू' संदर्भात भाष्य केले आहे. ते आवर्जून मुळातून वाचण्यासारखे आहे असे ते म्हणाले.

आदिवासी समाजाचे खगोलशास्त्रीय आकलन हा अत्यंत महत्त्वाचा विषय असून यावर खूप काम होणे बाकी आहे असे ते म्हणाले. प्रस्थापित समाजाच्या खगोलशास्त्रीय संकल्पना व आदिवासी समाजाच्या खगोलशास्त्रीय संकल्पना यांच्यामध्ये वेगळेपण आहे. उदाहरणार्थ गोंड जमातीतील आदिवासी सप्तर्षी ताऱ्याकडे 'एका म्हातारीचा पलंग व तीन चोर तो पलंग चोरू पाहताहेत' असे चित्र रंगवतात. त्याच्या आदिवासी जमातीतील प्रचलीत सुधारणांच्या आधारे खगोलशास्त्राचे आकलन करता येते. आतापर्यंत केवळ दहा आदिवासी

जमातीं मध्ये जाऊन त्यांचे खगोलशास्त्रीय आकलन समजून घेण्याचा प्रयत्न झाला असून, भारतात एकूण चारशे आदिवासी जमाती आहेत. या क्षेत्रात खूप काम करण्यास वाव आहे असे ते म्हणाले. अंदमान येथे आदिवासींच्या खगोलशास्त्रीय आकलनाचे काम करताना असे लक्षात आले की, सुनामी मुळे त्यांनी उभे केलेले खगोलशास्त्रीय मापनाचे अनेक स्तंभ व मानके नष्ट झालेली असून हे विज्ञान काळाच्या पडद्याआड जात आहे.

खगोलशास्त्रीय आकलनाचा तिसरा टप्पा म्हणजे खगोलशास्त्रीय सांस्कृतिक मिथकांचा अभ्यास. त्यांच्या मते भविष्यशास्त्र (astrology) हे ग्रीक लोकांकडून आपण पाचव्या शतकामध्ये आयात केलं आहे. हडप्पा संस्कृतीतील धोलावीरा या गावाच्या पुरातत्वीय उत्खननाचा आधार देत तेथे सापडलेल्या नाण्यांवर ग्रहांची वेगवेगळी चित्रे पाहायला मिळतात असे ते म्हणाले. नाणेशास्त्र व खगोलशास्त्रांचा परस्परसंबंध आहे. बृहदारण्यक उपनिषद यामध्ये गार्गी व याज्ञवल्क्य यांचा संवाद असून त्यामध्ये सृष्टीतील छोट्या घटकापासून आकाश, नक्षत्र, तारका इत्यादी पर्यंत चढत्या क्रमाने विश्वाचा पसारा सांगितला आहे. विशेष म्हणजे हा क्रम कंबोडिया येथील अंकोरवाट या प्रसिद्ध मंदिरामध्ये आपल्याला पाहायला मिळतो.

खगोलशास्त्रीय विकासाचा चौथा टप्पा म्हणजे आधुनिक तंत्रज्ञान आधारित खगोलशास्त्र. आपल्याकडील अनेक खगोलशास्त्रीय ग्रंथ पाहायला मिळतात. आपल्या पारंपरीक ज्ञानाचे अजूनही दस्तऐवजीकरण झालेले नाही आणि ही खूप शोकाची गोष्ट आहे असे ते म्हणाले. आर्यभट्ट यांनी ग्रहांमधील अंतराचे अचूक गणित मांडले होते. वराहमिहिराने अनेक खगोलशास्त्रीय गोष्टींचा उल्लेख केला होता. या सर्व गोष्टींचे पुन्हा एकदा आकलन पुढील पिढीने करायला हवे असे ते म्हणाले. आज आपल्याला माहिती असलेली अनेक मोठी मंदिरे ही तत्कालीन खगोलशास्त्रीय चिंतनांचे दीपस्तंभ आहेत असे ते म्हणाले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, एखादी लोकोत्तर व्यक्ती जन्मताच विद्वान कधीच नसते मात्र मोठ्या कष्टाने व जिज्ञासेने ती प्रत्येक गोष्ट मिळवू शकते. भौतिकशास्त्र आणि गणिताचे चांगले आकलन झाल्याशिवाय मूलभूत विज्ञान क्षेत्रात संशोधन परिणामकारक होणार नाही असे ते म्हणाले. व्याख्यानानंतर प्रश्नोत्तरांचा तास रंगला.

या व्याख्यानासाठी विद्या प्रसारक मंडळ संचलित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष राणे यांनी केले व आभार प्रदर्शन व्यवस्थापन संस्थेचे महासंचालक श्री. गुरु प्रसाद मूर्ती यांनी केले. हे व्याख्यान जिज्ञासूंसाठी विद्या प्रसारक मंडळाच्या यू ट्यूब चैनल वर उपलब्ध करण्यात आले आहे असे डॉ. विजय बेडेकर म्हणाले.

**वार्तांकन : डॉ. प्रशांत धर्माधिकारी**

•••

दिशा
नियमित
वाचा.


आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

माणूस सत्तेवर आला की त्याचा खरा स्वभाव प्रकट होतो!

# 'जिंकलेले क्षण'

*नुकतेच डॉ. रंजन गर्गे यांचे 'जिंकलेले क्षण' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. माजी कुलगुरू महात्मा गांधी मिशन विद्यापीठ औरंगाबाद डॉ. सुधीर गव्हाणे यांच्या हस्ते या पुस्तकाचे विवेकानंद जयंतीच्या दिवशी प्रकाशन झाले. हे पुस्तक 'मूल्यशिक्षण' या विषयावर आहे. इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट या संस्थेचे अध्यक्ष आचार्य जयप्रकाश बागडे यांनी या पुस्तकाचे समीक्षण केले आहे - संपादक*

आज नेमक्या कोणत्या शिक्षणाची गरज आहे ? आणि हे अपेक्षित शिक्षण कुठे देता येईल ? सध्याच्या शिक्षणाची दोन व्यवच्छेदक लक्षणे स्पष्ट दिसतात. एक आहे स्मरणशक्ती आणि दुसरी आहे तर्कशक्ती. परंतु या पलीकडे मुलांमध्ये इतर अनेक शक्ती वास करत असतात. त्यांच्या विकासाचे काय ? त्या विकसित न झाल्यामुळे त्यांच्या आयुष्यात कायमस्वरूपी काही भौतिक आणि मानसिक अवरोध निर्माण होतात. यासाठी विद्यार्थ्यांमध्ये धृतीच्या शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. म्हणजेच मनोबल वाढावे, चित्त स्थिर ठेवता यावे, दृढ संकल्प तडीस नेता यावे, विपरीत परिस्थितीला धैर्याने सामोरे जाता यावे, साहस वाढावे, निर्भयता अंगी बाळगावी, परस्पर सहकार्याची भावना वाढावी अशासाठी शिक्षणाची कुठे योजनाच दिसत नाही. आणि त्याला जोडून येणारी चारित्र्य, शील, निष्ठा, पर्यावरण स्नेह यांची जाणीव तर व्यक्तिमत्त्व विकासासाठी फार महत्त्वाची ठरते. याचे शिक्षण ना घरात ना शाळेत उरलेले आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. रंजन गर्गे यांचे 'जिंकलेले क्षण' हे पुस्तक म्हणजे मानवी मूल्ये कशी जपावी यासाठी लिहिलेली अमृत धारा आहे. या पुस्तकाचे लेखक डॉ. रंजन गर्गे हे मराठी विज्ञान परिषद, औरंगाबाद विभागाचे अध्यक्ष आहेत. विज्ञान प्रसाराने प्रेरीत झालेले गर्गे यांनी विज्ञानाव्यतिरिक्त पत्रकारिता, साहस आणि मानव संसाधन व्यवस्थापन या क्षेत्रात देखील आपल्या सिद्धहस्त लेखणीने अनेक पुस्तकांचे लेखन केले आहे. इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट या संस्थेच्या औरंगाबाद विभागातर्फे 'झूम' या आभासी व्यासपीठावर माजी कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे यांच्या शुभहस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले.




या पुस्तकात ८० नैतिक मूल्यांच्या आधारे व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू लेखकाच्या सिद्धहस्त लेखणीतून साकारलेले आहेत. यात मुक्त चिंतनाद्वारे विविध दाखले देत, कथारूपात अत्यंत प्रभावीपणे आणि ओघवत्या भाषेत हे लिखाण केलेले आहे. पुस्तकाच्या पहिल्याच प्रकरणात लेखक आत्मजाणिवांच्या

समाजात मिसळल्याने आपले दोष कळतात.

मानसशास्त्रीय प्रारूपाची ओळख करून देतो. मी आणि समाज यांच्या किंवा दोन संघांच्या दरम्यान माहितीच्या संदर्भात असलेले नाते तपासून बघण्याची गुरुकिल्ली लेखकाने प्रथम वाचकाच्या हातात सोपवली आहे. 'श्रद्धा' या प्रकरणात लेखक म्हणतो 'श्रद्धेला जोपर्यंत विवेकाचे अस्तर असते तोपर्यंत श्रद्धा माणसाच्या जीवनाला समृद्ध करणाऱ्या ऊर्जेचे काम करते. पण विवेकशून्य श्रद्धा मात्र माणसाच्या जीवनात कोलाहल निर्माण करते.'

'धैर्य' या कौशल्याबद्दल लेखक म्हणतो 'धैर्य हे असे वाहन आहे की, जे आपल्या चालकाला कोणाच्या पायाशी किंवा कोणाच्या नजरेतून कधीच खाली पडू देत नाही. धैर्य ही जीवनाची अशी किल्ली आहे की, जी यशस्वीतेचा दरवाजा उघडते.' आपल्याला पडलेल्या प्रश्नांचा, समस्यांचा, अडचणींचा, संकटांचा आपण नेहमीच बाऊ करतो. पण हे मुळात इतके आव्हानात्मक आहे का? याचा खोलवर विचार करा. माझ्याकडे काय नाही या पेक्षा चांगले काय आहे ? मी चांगले काय देऊ शकतो? चांगले काय करू शकतो? याचा विचार करा. प्रश्नातच त्याचे उत्तर दडलेले असते, म्हणून प्रश्नावर लक्ष केन्द्रित करा, त्या व्यक्तीवर नव्हे! मुळात समस्या ही समस्याच नसते ती एक संधी असते, असे लेखक म्हणतो.

सुख आणि आनंद यांच्यातील अस्पष्ट सीमारेषेबद्दल लेखक म्हणतो 'मला दुःखद प्रसंगी किंवा अडचणीच्या वेळी मात्र ईश्वराची प्रकर्षाने आठवण होते. मग मी नियमित ध्यानधारणा करायला लागतो. मी कुठेतरी विश्वास ठेवायला लागतो, मी शिस्तबद्ध वागायला लागतो, मला नम्रतेची जाणीव व्हायला लागते, आणि अशा अडचणीच्या वेळी मी माझ्यातल्या उत्तमोत्तम गुणांचा आविष्कार करतो. म्हणजे अडचणीच्या काळात आपण जे करतो तेच आपण जर सुखासीनतेच्या काळात केले तर आपल्यावरती वाईट वेळ येणारच नाही आणि मग आपल्याला मिळेल तो निखळ आनंद. समोर आलेले प्रत्येक काम भले आपण आनंदाने करत असाल पण त्याच कामातून आपण आनंद निर्माण करू शकलात तर आपण खरे आनंदी असाल!'

आपल्या आयुष्यात येणारे दुःखद आणि निराशाजनक क्षण उगाळत बसण्यापेक्षा जिंकलेला प्रत्येक क्षण जगायला पाहिजे. विचारातील सकारात्मकता, बदल स्वीकारण्याची वृत्ती, आत्मशोध, सत्त्वशीलता, अनुभव, आंतरिक ऊर्जा, संघटन कौशल्य या द्वारे आपल्या जीवनातील प्रत्येक क्षण आपण जिंकायला हवा. त्यातून अनुभवसंपन्न बनून यशस्वीतेकडे होणारी वाटचाल नक्कीच सुकर बनेल.

जिंकलेल्या क्षणांकडून आपण शिकणार कधी? आव्हानांचे संकेत ओळखणार कधी ? धैर्याच्या किल्लीने यशस्वीतेचा दरवाजा उघडणार कधी? निष्ठांचा परीघ व्यापक करणार कधी ? पराभूत मनोवृत्तीचा त्याग करणार कधी? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे या पुस्तकात आपल्याला मिळतील.

या पुस्तकातील संजीवनी देणाऱ्या अमृत कणांचे वाचक, पालक आणि शिक्षक नक्की स्वागत करतील.

लेखक : डॉ. रंजन गर्गे
प्रकाशक : एव्हीबी क्रिएशन
पृष्ठ संख्या : २४६
किंमत : २०० रुपये

**– आचार्य जयप्रकाश बागडे**
अध्यक्ष
इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट,
औरंगाबाद विभाग

•••

पक्ष्यासारखं उडणं, माशासारखं पोहणे सोपं आहे. माणूस होणं मात्र कठीण आहे!

# हिंदुत्व समजून घेताना

*हिंदुत्वाबद्दल विवेचन या लेखात केले आहे - संपादक*

हे राष्ट्र प्राचीन आहे आणि हे राष्ट्र अनेक बऱ्या-वाईट टप्प्यांतून गेलेले आहे. पण भारतामध्ये ज्याला ‘प्रबोधन युग’ म्हणता येईल तसं प्रबोधन युग ब्रिटिश कालखंडात घडलं. बंगालमध्ये साधारणत: १८०० च्या सुमारास ब्रिटिशांनी प्रथम सत्ता हातात घेतली आणि हळूहळू ब्रिटिशसत्ता भारतभर पसरल्यानंतर साधारणत: १८३०-४० पासून ह्या प्रबोधन युगाच्या कालखंडाला सुरुवात झाली. आणि त्या शंभर-सव्वाशे वर्षांचं, त्या सगळ्या प्रबोधन युगाचं अंतिम फळ म्हणजे भारताचं संविधान आहे हे आधीच नमूद करतो. त्यातच आपल्या आजच्या नवहिंदुत्वाची बीजं आहेत.

हे जे नवहिंदुत्व आहे ते परंपरेने प्राप्त झालेला आपला जो काही वारसा आहे त्याच्यापासून भिन्न आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आणि या नवहिंदुत्वाला कुणी एक प्रेषित नाही, तर या देशातील हजारो व्यक्ती व त्यांचं विचारमंथन आहे. आगरकरांच्या भाषेत हे नेमकं सांगायचं झालं तर तो ‘विचारकलह’ आहे. आणि योग्य दिशेने सुरू असलेल्या विचारकलहाने समाज कमकुवत होत नाही, तर तो अधिक सक्षम होतो हे आपण लक्षात ठेवण्याची गरज आहे.

ह्या प्रबोधन युगात होऊन गेलेली सगळी महान माणसं डोळ्यांसमोर आणा, ज्यांनी आजच्या नवहिंदुत्वाला ताकद दिली. जवळपास निद्रिस्त असलेला आपला प्राचीन समाज ब्रिटिश कालखंडामध्ये जेंव्हा एका अत्यंत प्रगत अशा संस्कृतीशी (भलेही गुलामगिरीमुळे का असेना) संपर्कात आला त्यातून हा समाज जागा झाला. तो विचार करू लागला की, आपल्यात काय कमी आहे? आपल्यात काय दोष आहेत जे आपण आता टाकले पाहिजेत आणि आपला समाज हा अधिक चांगला केला पाहिजे.

त्यामुळे जेंव्हा आपण एकविसाव्या शतकातून मागे वळून पाहतो तेंव्हा आपल्याला दिसतं की, त्या काळामध्ये ते जागृत लोक एकमेकांशी अनेक विषयांवर वाद-प्रतिवाद करीत असतील, वेगवेगळ्या पद्धतीने काही प्रयोग करीत असतील, पण त्या सगळ्या प्रक्रियेतून आपल्या समाजाला काही-न-काहीतरी दृष्टी प्राप्त झाली.

ज्या बंगालमध्ये या प्रबोधन युगाची प्रथम सुरुवात झाली तिथं आपल्याला राष्ट्रवाद नामक विचारांची एक मांडणी सुरू झालेली दिसते. आणि ही मांडणी केवळ बंगालचीच नाही तर, संपूर्ण भारत डोळ्यांसमोर ठेवून एकूण भारतीय संस्कृती व सगळया समाजाचा सर्वसमावेशक विचार करून भारतीय राष्ट्रवादाची मांडणी सुरू झालेली आपल्याला दिसेल.

चर्चा म्हणून विवेकानंदांचं उदाहरण पहा. विवेकानंदांनी आपल्याला एक महत्त्वाची देणगी दिली. आपल्या कुंभमेळ्यात लाखो करोडो लोक जमतात; पण ते सगळे व्यक्तिगत मोक्षासाठी जमतात. पण आपण एक समाज आहोत आणि परमेश्वर पाहायचा असेल तर तो आपल्या समाजातील उपेक्षितांमध्ये पाहिले पाहिजे आणि त्याची सेवा करण्याइतकं अत्युच्च दुसरं काही नाही; हा तो समाजासाठी संन्यस्त होण्याचा विचार विवेकानंदांनी दिला. आजही रामकृष्ण मिशन मध्ये आपल्याला ते दिसेल.

आर्यसमाजाकडे पाहिले तर दयानंदानी आपल्याला फार महत्त्वाचा मुद्दा दिला जो आपल्या जुन्या हिंदुत्वात नव्हता. तो म्हणजे, जे आपल्याच समाजातील आहेत परंतु काही कारणांमुळे ते बाटवले गेले होते, त्यांना पुन्हा आपल्या समाजामध्ये परत घेण्यासाठीची 'शुद्धी चळवळ' हे दयानंदांचं नवहिंदुत्वाला दिलेलं योगदान आहे. आणि हे खरोखरचं नवीन आहे याची आजच्या लोकांना कल्पना नाही.

शुद्धीकरणासंदर्भात आपण शिवाजी महाराजांचं नेताजी पालकर यांचं उदाहरण देतो. पण कल्पना करा की, जर नेताजी पालकर 'महम्मद कुली खान' म्हणून मेले असते, तर त्यांच्या मुलांना आपल्या समाजात परत येण्याचा मार्ग प्राचीन हिंदू धर्मात उघडा होता का? तर तो नव्हता. दयानंदांनी, तुम्ही कधी का मुसलमान झालेले असेनात, तुमचे बापजादे-परजादे, आजोबा-पणजोबा-खापर पणजोबा, कधी का परधर्मात गेलेले असेनात पण तुम्ही आमचेच आहात, त्यामुळे तुम्ही परत या असे आवाहन केले. हे फार मोठं काम त्यांनी केलं.

प्रार्थनासमाजात सुरुवातीला ख्रिस्ताची प्रार्थना व्हायची. पण भांडारकरांनी, रानडेंनी 'तुकाराम अभ्यास मंडळ' स्थापन करून तुकाराम महाराजांचे अभंग हा त्या प्रार्थनासमाजाचा पाया बनवला. म्हणजे बहुजनांच्या चळवळीतून आलेली जी काही आध्यात्मिक समतेची संकल्पना आहे तिला सामाजिक पातळीवर आणण्याचा तो एक नव-प्रयोग आहे. सत्यशोधक समाज, ब्राह्मो समाज देखील याचप्रमाणे त्या काळातील नव-प्रयोग आहेत.

जर आपण नीट पाहिले तर, हीह सर्व मंडळी आपल्याला काय सांगताहेत तर 'Change for Better'. म्हणजे समाजाचं परिवर्तन हवंय, पण ते कशासाठी हवंय? तर आपल्या समाजामध्ये अनेक दोष आहेत. आणि ह्या समाजाचा सगळ्यात मूलभूत दोष आहे तो दोष म्हणजे 'जन्मसिद्ध समाज व्यवस्था'. ही जन्मसिद्ध व्यवस्था जी परंपरेने आलेली आहे ती हिंदू संघटन चळवळीला घातक आहे. हिंदू समाजात सर्व प्रकारच्या ज्या काही श्रेष्ठत्व-कनिष्ठत्वाच्या, भेदाभेदाच्या कल्पना आहेत, ज्या जन्मसिद्ध आहेत, त्या आधी गेल्या/ घालवल्या पाहिजेत.

सावरकरांनी 'हिंदुत्व' नावाचा जो ग्रंथ लिहिला व पुढे आयुष्यभर जी मांडणी केली, त्या हिंदुत्वामध्ये देखील हे जन्मसिद्ध, पारंपरिक पद्धतीने जे काही आपल्यापर्यंत आलेलं संचित आहे ते नाकारून स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या मूल्यांच्या आधारावर समाजाच्या पुन:निर्माण याविषयी ते बोलत होते. हेच बाबासाहेबांनीही म्हटलेलं आहे.

आणि अशा प्रकारच्या ह्या नवीन बांधणीला खऱ्या अर्थाने जलद गती देणारी एक महत्त्वाची घटना घडली ती म्हणजे औद्योगिक क्रांती. तसं बघायला गेलं तर ही एक भौतिक घटना आहे, पण ती फक्त भौतिक घटना नसून एक नैतिक घटना सुद्धा आहे. कारण कालपर्यंतचा जो आपला गावगाडा होता तो गावगाडा एक प्रकारची अर्थव्यवस्था देखील होती. लोक त्या गावगाड्याच्या आधारावरच पोट भरत होते. 'गावगाडा' नावाचं त्र्यंबक आंत्रे लिखित एकच पुस्तक वाचले तर आपल्याला कळेल की, आपला पुरातन हिंदू समाज कसा श्रेणीबद्ध आहे. गावात कोण, गावाबाहेर कोण, भटके कोण याचे नीतिनियम किती घट्ट आहेत/होते. तो गावगाडा तोडून-फोडून टाकण्याची ताकद एखाद-दुसऱ्या माणसांत नव्हती. कारण जुनं टाकून द्यायचे तर माणसाला त्याच्या कर्तबगारीच्या बळावर संधी देण्याची क्षमता असणारी एक पर्यायी अर्थव्यवस्था नव्याने जन्माला यावी लागते. या गावगाड्याला नष्ट करायचं असेल तर अशी संधी

देणारी शहरं जन्माला यावी लागतात. त्यामुळे शहरं ही म्हणजे नरक नव्हे, तर एक प्रकारची मुक्तीद्वारं ठरली.

तसेच, उपरोक्त प्रबोधन युगातून आलेलं आपलं जे नवहिंदुत्व आहे त्यामध्ये गडबड अथवा बोटचेपेपणा असता कामा नये हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. त्यात जात, लिंग, भाषा, आहार यावरून भेदाभेद, असमानता याला काहीही स्थान नाही. आपण सर्व हिंदूंमध्ये समान दर्जा पहायला हवा. एक माणूस म्हणून त्यांना असलेल्या हक्कात काहीही कमी-अधिक-उणे करून चालणार नाही.

पण आजही आपल्यामध्येच काही माणसं आहेत ज्यांचा काही वेळेला बेसूर लागतो. ज्यामुळे आपल्या सर्वसमावेशक व आधुनिक नवहिंदुत्वाला धक्का लागेल असा त्यांचा विचार-आचार पहायला मिळतो. त्या विरोधात ठामपणे आपण उभं रहायला पाहिजे. जो कुणी आज जुन्यापुराण्या कालबाह्य व घातक परंपरांच्या आधाराने हिंदुत्वाच्या नावाखाली काही मांडण्याचा प्रयत्न करीत असेल तर ते आता 'आमचं नाहीये' असं आपल्यालाच सांगावं लागेल.

त्याशिवाय काही लोकांना अजून एक खोड असते, ती म्हणजे 'यात तुम्ही नवीन काहीच सांगत नाही हो, हे सगळं तर पूर्वीपासूनच आमच्याकडे होतं'. तर नीट लक्षात घ्या, एखादी गोष्ट आपल्याकडे नव्हती असं मानणं हे काही पराभूत वृत्तीचं लक्षण नाहीये. एखादी गोष्ट पूर्वी आपल्याकडे नव्हती आणि नव्याने आलेली असेल तर त्यात काय बिघडलं? आपल्या नवहिंदुत्वाची शक्ती काय आहे तर जे काही नव-नवीन येतंय ते आत्मसात करून शक्तिमान व्हायचं. चांगल्या गोष्टींना आपण कधीच विरोध केला नाही. त्यामुळे प्राचीन काळी आमच्याकडे सगळं काही होतं, असं उगाचच म्हणण्याची काही गरज नाही.

आपलं हिंदुत्व हे कधीही विज्ञानविरोधी असूच शकत नाही/असू नये. आपण परिवर्तनशीलता हा डावा विचार मानत असू तर त्या परिप्रेक्षात हिंदुत्व हे डावे आहे, म्हणजेच परिवर्तनवादी आहे, ते स्थितीशील नाहीये, ते 'जैसे-थे'वादी नाहीये. परंपरेने जे चालत आलेलं आहे ते तसंच चालणार या विचारांचं ते नाहीये. कुठल्याही परिस्थितीमध्ये आहार, वेशभूषा, भाषा, प्रांत, केशभूषा, खाजगी संबंध, अध्यात्म यावरून हिंदुत्ववाद्यांनी असा कोणताही कार्यक्रम राबवू नये ज्यामुळं आपल्या सगळ्या हिंदू समाजाच्या ऐक्याला त्यामुळे बाधा निर्माण होईल. आपण हिंदू आहोत हे एकत्व निर्माण करण्यासाठी स्वाभाविकच ते हिंदुत्व सर्वसमावेशक असले पाहिजे.

आपण बाकीच्यांशी नक्कीच लढू, मग ते माओवादी असतील, ब्रिगेडी असतील; बामसेफी असतील किंवा अजून कुणी असतील, पण त्याचप्रमाणे ते सनातनी, उच्च-निच्च मानणारे ब्राह्मणवादीही असू शकतात. जे हिंदुत्वाचा बुरखा घेऊन विकृत स्वरूपात हिंदुत्व मांडू शकतात. आपल्यात असे जे कुणी किडे असतील ते टिपून-टिपून बाहेर काढता आले पाहिजेत.

अशा पद्धतीचं नवहिंदुत्व घेऊन आपण आपल्या समाजासमोर जर उभे राहिलो व त्या हिंदुत्वाच्या रक्षणासाठी म्हणून संघर्ष केला तर या हिंदुत्वामध्ये वैगुण्य काढायला कुणाकडे काय असेल? आणि अशा वैगुण्य विरहित समाजात सगळ्या स्तरातील लोकांना खात्री पटेल की, 'हो, हे हिंदुत्व म्हणजेच माझा परिचय आहे.'

**- तुषार दामगुडे**
ज्येष्ठ अभ्यासक
पुणे

•••

गर्दीत राहूनही आपण एकटेच असतो!

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

### विज्ञान दिन अहवाल

दरवर्षी विज्ञान दिवस २८ फेब्रुवारी रोजी साजरा करण्यात येतो.

या वर्षी प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने विज्ञान दिन साजरा केला.

इयत्ता २ री च्या विद्यार्थ्यांनी, 'आधुनिक भारतातील महान वैज्ञानिक भारतरत्न सी. व्ही. रमन यांचे विज्ञान क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदान' यावर माहिती देऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्याचप्रमाणे विज्ञानाचा आपल्या दैनंदिन जीवनात कशाप्रकारे उपयोग होतो यावर माहिती देण्यात आली. त्यामुळे आपले जीवन कसे सोयीस्कर झाले आहे याविषयीचे ज्ञान प्राप्त झाले.

इयत्ता ३ री च्या विद्यार्थ्यांनी 'पर्यावरण' हा विषय घेऊन त्यावर विविध कवितांचे सादरीकरण करण्यात आले. इयत्ता ४ थी विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर निरनिराळे प्रयोग सादर केले. उदा. हृदयाचे कार्य, ज्वलनास ऑक्सीजनचे महत्त्व, पाण्याचे विविध स्रोत.

विद्यार्थ्यांनी 'विज्ञान दिन' अतिशय उत्साहाने साजरा केला.

### ऑनलाईन आंतरराष्ट्रीय स्पेल बी परीक्षेचा निकाल (२०२१ – २२)

ऑनलाईन आंतरराष्ट्रीय स्पेल बी परीक्षेचा तिसऱ्या स्तराचा निकाल लागलेला असून, सौ. ए. के. जोशी शाळेच्या प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांची नावे खालीलप्रमाणे :

| अनु. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इ. | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| १. | युक्ता धीरज झगडे | २री | ९९ |
| २. | कार्तिकी जगदीश शिंदे | ४थी | ९८ |

सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !

### मराठी भाषा दिवस उत्सव-२०२२(२६-०२-२०२२)

मराठी भाषेच्या सन्मानार्थ आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी दिवंगत व्ही. व्ही. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्लिश मीडियम शाळेच्या प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी 'मराठी भाषा दिवस' ऑनलाईन साजरा केला.

कार्यक्रमाची सुरुवात, मराठी भाषा दिवस आपण का साजरा करतो? याने करण्यात आली. त्यानंतर मराठीत प्रतिज्ञा व प्रार्थना म्हटली गेली. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन काव्यवाचन, गोष्ट, कविता सादरीकरण करून त्यांना भाषा व समृद्ध सांस्कृतिक वारसा प्रदर्शित करण्याची संधी देणारे उपक्रम सादर करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता संपूर्ण राष्ट्रगीताच्या पाच कडव्यांनी करण्यात आली.

विद्यार्थ्यांशी बोलताना जास्तीत जास्त मराठी शब्दांचा वापर योग्य उच्चारासोबत करणे यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. मराठी वाचा, मराठी बोला व मराठीवर प्रेम करा असे म्हणत त्यांना त्यांच्या राज्यभाषेवर प्रेम करण्याची प्रेरणा देण्यात आली.

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

**ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या जनसंज्ञापन विभागाच्या तृतीय वर्षातील विद्यार्थी पार्थ बागुल याच्या 'मास्क' या लघुपटाला उत्कृष्ट लघुपट व उत्कृष्ट दिग्दर्शक पारितोषिक प्राप्त**



२५ ते २७ मार्च दरम्यान भोपाळ येथे आयोजित 'भारतीय' चित्रसाधना चित्रपट महोत्सवात अ-व्यावसायिक श्रेणीमध्ये उत्कृष्ट लघुपट व उत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून पारितोषिक व रुपये ५०००० चे बक्षीस मिळाले. प्रख्यात सिनेअभिनेत्री पल्लवी जोशी यांच्या हस्ते त्याला हा पुरस्कार मिळाला. रवींद्र कन्व्हेन्शन सेंटर या भोपाळ मधील वास्तुमध्ये भरवलेल्या या चित्रपट महोत्सवासाठी भारत सरकारचे माहिती व प्रसारण राज्यमंत्री लोगनाथन मुरुगण उपस्थित होते.

भारतीय चित्र साधना ही संस्था चित्रपट क्षेत्रात भारतीय मूल्यांची प्रतिष्ठापना करण्यासाठी काम करते. तसेच राष्ट्रीय पातळीवर लघुपट महोत्सव भरवला जातो. या लघुपटाबद्दल बोलताना पार्थ म्हणाला की, माझ्या सारख्या व्हिलेज बॉयकडे कोणतेही अत्याधुनिक साधने नसतानाही मी माझा विचार मांडू शकलो आणि याची नोंद चित्रसाधनेन घेतली याचा मला आनंद वाटतो आहे. लघुपट बनवताना अनेक अनुभव आले, अनेक लोकांना भेटता आले. त्यांच्या समस्या आणि भावना जाणून घेता आल्या. करोना हे जागतिक संकट होते, मात्र संकटातही विद्यार्थ्यांना संधी शोधता आली पाहिजे.

या कामगिरीसाठी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी पार्थ बागुल याचे अभिनंदन केले आणि त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**जोशी बेडेकर महाविद्यालय एशिया टुडे शिखर पुरस्काराने सन्मानित**

**शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा गौरव**

**सर्वांगीण शिक्षणासाठी सर्वात आशादायक कला आणि वाणिज्य महाविद्यालय**




बंगलोर येथे एशिया टुडे रिसर्च अँड मीडियाने पार पाडलेल्या आशिया शिक्षण शिखर परिषद आणि पुरस्कार २०२२ समारंभात ठाण्यातील के. जी. जोशी कॉलेज ऑफ आर्टस आणि एन.जी. बेडेकर कॉलेज ऑफ कॉमर्स, स्वायत्त महाविद्यालय यांना सर्वांगीण शिक्षणासाठी सर्वात आशादायक कला आणि वाणिज्य महाविद्यालय या पुरस्काराने सन्मानित केले आहे.

हा कार्यक्रम २५ मार्च २०२२ रोजी हॉटेल ताज, बंगलोर येथे आयोजित करण्यात आला होता. शिक्षणावर

कोविड १९ चा प्रभाव या विषयांतर्गत 'शाळांच्या डिजिटल रणनीतीमध्ये यश मिळवण्यासाठी मुख्य घटक शोधणे आणि केंद्र सरकारने दिलेल्या नवीन धोरणांवर लक्ष केंद्रित करणे' हे या परिषदेचे उद्दिष्ट होते. इंडिया टुडे वाहिनी व इड्युकेशन टुडे नियतकालिक या पुरस्काराचे माध्यम सल्लागार होते.

या कार्यक्रमाला खासदार श्री. थावरचंद गहलोत (कर्नाटकचे माननीय राज्यपाल), श्री. धर्मेंद्र प्रधान (माननीय शिक्षण, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री, भारत सरकार) श्री. ए. एन. नारायण स्वामी (सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण, भारत सरकार), श्री. बसवराज होराट्टी (कर्नाटकचे माननीय अध्यक्ष, विधानपरिषद), डॉ. मुरुगेश रुद्रप्पा निरानी (माननीय मोठे आणि मध्यम उद्योग मंत्री, कर्नाटक सरकार), श्री. हलप्पा आचार (माननीय महिला आणि बालविकास, खाण आणि भूविज्ञान मंत्री, अपंग आणि ज्येष्ठ सक्षमीकरण, कर्नाटक सरकार), श्री. बी सी नागेश (माननीय प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण मंत्री आणि सकला, कर्नाटक सरकार) श्रीमती पूनम धिल्लन (भारतीय चित्रपट अभिनेत्री) इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

आशिया शिक्षण शिखर परिषद आणि पुरस्कार २०२२ हे एक प्रमुख आंतरराष्ट्रीय व्यासपीठ आहे जिथे शिक्षणातील नावीन्य आणि सर्जनशील कृतींसाठी समर्पित शीर्ष निर्णय घेणारे तज्ज्ञ विचारविनिमय करतात. त्याचबरोबर शिक्षणाचा पुनर्विचार करण्यासाठी सहयोग करतात. तसेच हा पुरस्कार संस्थेचे शैक्षणिक क्षेत्रातील व्यावसायिक योगदान आणि शैक्षणिक कामगिरीचा संपूर्ण आढावा अशा निकषांद्वारे दिला जातो. त्यामुळे ठाण्यात अनेक वर्षांपासून शिक्षणाची सेवा देणाऱ्या सर्वात जुन्या संस्थांपैकी एक, विद्यार्थ्यांचे प्रचंड सामर्थ्य, उत्कृष्ट पायाभूत सुविधा, पात्र विद्याशाखा, अध्यापनाची नावीन्यपूर्ण पद्धती, विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालण्यासाठी महाविद्यालयीन पुढाकार यामुळे या पुरस्कारासाठी विद्या प्रसारक मंडळाच्या के. जी. जोशी आणि वा. ना. बेडेकर कॉलेज ऑफ कॉमर्स या महाविद्यालयाची निवड झाली. आशिया शिक्षण शिखर परिषदेच्या बेंगलोर येथे पार पडलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील सर्वांगीण शिक्षणासाठी सर्वात आशादायक कला आणि वाणिज्य महाविद्यालय या पुरस्काराने महाविद्यालयाला सन्मानित केले गेले. यावेळी महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक व उपप्रचार्या डॉ प्रियंवदा टोकेकर यांनी कर्नाटकचे माननीय राज्यपाल श्री. थावरचंद गेहलोत यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचे दूरदर्शी नेतृत्व व मार्गदर्शन व विद्या प्रसारक मंडळ परिवाराच्या सततच्या पाठिंब्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले.

### मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवात घवघवीत यश



महाविद्यालयाच्या इतिहासात पहिल्यांदाच मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवामध्ये सर्व विभागांमध्ये अव्वल आल्यामुळे सर्वोत्तम महाविद्यालयाचे पारितोषिक मिळाले. महाविद्यालयाने १५ पैकी ९ स्पर्धांमध्ये सर्वोत्तम कामगिरी केल्यामुळे हे यश साधता आले. प्रा. रोहित बापट व टॅलेंट अकॅडमीच्या समन्वयक डॉ मुग्धा बापट यांनी या कामात मोलाचे योगदान दिले.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**'मराठी भाषा दिवस' आणि 'राष्ट्रीय विज्ञान दिवस' संपन्न २८ फेब्रुवारी २०२२**

संशोधन समितीविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २८ फेब्रुवारी २०२२ रोजी 'मराठी भाषा दिवस' आणि 'राष्ट्रीय विज्ञान दिवस' ऑनलाइन व ऑफलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला.

सौ. मेघना साने (लेखिका, नाटक कलाकार आणि अँकर, मुंबई), श्री. सुहास नाईक-साटम (सचिव, नॅशनल सेंटर फॉर सायन्स कम्युनिकेशन (NCSC), माजी कार्यक्रम अधिकारी, नेहरू तारांगण, मुंबई) आणि श्री. सुधाकर आगरकर (डीन, व्हीपीएम अकादमी ऑफ इंटरनॅशनल एज्युकेशन अँड रिसर्च) हे तीन प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

सौ. मेघना साने यांनी कल्पकतेने मेरी क्युरी (नोबेल पारितोषिक विजेते) यांची प्रेरणादायी कथा तयार केली आणि सादर केली जी एक भौतिकशास्त्रज्ञ, रसायनशास्त्रज्ञ आणि रेडिएशनच्या अभ्यासात अग्रणी होती. रेडियम आणि पोलोनियमच्या संबंधित घटकांचा शोध विद्यार्थ्यांनी जाणून घेतला.

श्री. नाईक-साटम यांनी विद्यार्थ्यांना डॉ. सी. व्ही. रामन यांचे उदाहरण देऊन निसर्गाचे कटाक्षाने निरीक्षण करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात विज्ञानाचा उपयोग शिकला.

डॉ. आगरकर यांनी संसाधनांच्या शाश्वत वापराच्या गरजेवर आपले विचार मांडले. जैव-संसाधनांचा विवेकपूर्वक वापर आणि संवर्धन करण्याच्या संभाव्य पर्यायांबद्दल प्रेक्षक विचार करायला लावतात.

पाहुण्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणां व्यतिरिक्त, शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी पुस्तक प्रदर्शन भरवण्यात आले होते. त्यात प्रसिद्ध मराठी लेखकांची पुस्तके आणि वैज्ञानिक तथ्यांशी संबंधित पुस्तकांचा समावेश होता.


या कार्यक्रमाला १५६ विद्यार्थी उपस्थित होते.



सौ. मेघना साने



डॉ. सुहास नाईक-साटम



पुस्तक प्रदर्शन

**जिमखाना समिती उद्घाटन सोहळा निमित्त विविध स्पर्धांचे आयोजन**

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त) जिमखाना समितीने ७ मार्च २०२२ रोजी जिमखान्याचे ऑफलाइन उद्घाटन सोहळा आयोजित केला होता. उद्घाटनानिमित्त, बांदोडकर महाविद्यालयाच्या जिमखाना समितीने टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेमध्ये एकूण २२ विद्यार्थ्यांनी (१७ मुले व ५ मुली) भाग घेतला आणि त्यांचे उत्कृष्ट कौशल्य दाखवले. सकाळी ११ वाजता सुरू झालेले

सामने दुपारी ३ वाजेपर्यंत संपले. कु. आदित्य निकम आणि कु. सर्वेश सडवेलकर हे या स्पर्धेचे विजेते ठरले.

त्याचबरोबर ७ मार्च २०२२ रोजी जिमखाना समितीने विद्यार्थ्यांसाठी बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन केले होते. एकूण ३२ विद्यार्थ्यांनी (२४ मुले व ८ मुली) या स्पर्धेत त्यांचा सक्रिय सहभाग दर्शवला. ही स्पर्धाही सकाळी ११ वाजता सुरू होऊन दुपारी ३ वाजेपर्यंत संपली. कु. वीरेन गावडे आणि कु. लवकुश चौधरी हे विजेते होते.



१० आणि ११ मार्च २०२२ रोजी जिमखाना समितीने कॅरम स्पर्धा आयोजित केली होती. एकूण ६५ सहभागी (५२ मुले व १३ मुली) असलेल्या या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. दोन्ही दिवशी या स्पर्धेचा कालावधी दुपारी १२ ते सायंकाळी ५ असा होता. या स्पर्धेतील मुलांमध्ये कु. आदर्श उबाळे आणि कु. कलश डोंगरे, तर मुलींमध्ये कु. स्वाती खटके आणि कु. साक्षी चव्हाण या विजेत्या ठरल्या. जिमखाना समितीने १६ मार्च २०२२ रोजी बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. सर्वांनी पूर्ण उत्साहाने भाग घेतला. सर्व कार्यक्रम मोठ्या उत्साहाने आणि यशस्वीपणे पार पडले.





**जिमखाना समिती**

**यशवंतराव चव्हाण जयंतीनिमित्त दैनिक लोकवार्ता प्रकल्प वृत्तपत्राचा प्रकाशन सोहळा**

विद्या प्रसारक मंडळाच्या बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय ठाणे येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रात यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीचे औचित्य साधून वृत्तपत्र व जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी प्रकल्प अहवाल म्हणून लोकवार्ता या दैनिकाचे प्रकाशन दिनांक १२ मार्च २०२२ रोजी करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून बांदोडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोजेस कोलेट, ग्रंथपाल व केंद्र संयोजिका सौ. कादंबरी मांजरेकर, अभ्यासक्रमाचे मार्गदर्शक प्रा. दाभोळकर व प्रा. शैलेश कसबे उपस्थित होते. तसेच वृत्तपत्रविद्या जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रमाचे विद्यार्थी हे उपस्थित होते.

विद्या प्रसारक मंडळाच्या बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय ठाणे येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रात यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीचे औचित्य साधून वृत्तपत्र व जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी प्रकल्प अहवाल म्हणून लोकवार्ता या दैनिकाचे प्रकाशन दिनांक १२ मार्च २०२२ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून बांदोडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोजेस कोलेट, ग्रंथपाल व केंद्र संयोजिका

सौ. कादंबरी मांजरेकर, अभ्यासक्रमाचे मार्गदर्शक प्रा. दाभोळकर व प्रा. शैलेश कसबे उपस्थित होते. तसेच वृत्तपत्रविद्या जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रमाचे विद्यार्थी हे उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात कादंबरी मांजरेकर यांनी वरील अभ्यासक्रम आणि अभ्यासकेंद्र या बाबत माहिती दिली.





**भौतिकशास्त्र विभाग कार्यशाळा १५ मार्च २०२२**

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभाग यांच्या तर्फे १५ मार्च २०२२ रोजी Peer Group Interaction Session या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्याशाळेमध्ये तृतीय वर्ष व एम.एस.सी. चे ३३ विद्यार्थी सहभागी झाले होते.

बीएससी/एमएससी (भौतिकशास्त्र) नंतर करिअरचे विविध पर्याय, SET/NET परीक्षांची तयारी कशी करावी? SSB, SSC, MPSC, UPSC, बँक परीक्षा इत्यादीसारख्या इतर स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी, बीएससी/एमएससी (भौतिकशास्त्र) नंतर संरक्षण क्षेत्रात करिअरचे पर्याय, बीएससी फिजिक्स नंतर डेटा सायन्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) मध्ये करिअर पर्याय इत्यादी वर मार्गदर्शन करण्यात आले.



**जिमखाना विभाग पारितोषिक वितरण समारंभ २०२१–२०२२**

जिमखाना समितीने १९ मार्च २०२२ रोजी जिमखान्याचे ऑफलाइन उद्घाटन सोहळा आयोजित केला होता. टेबल टेनिस, बुद्धिबळ, कॅरम, बॉक्स क्रिकेट आणि अनेक क्रीडा स्पर्धा आयोजित केल्यानंतर जिमखाना समितीने पारितोषिक वितरण समारंभ आयोजित केला होता. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे श्री. राजेश गाडगीळ सर (छत्रपती पुरस्कार विजेते) आणि श्री. संजय एम., प्रा. आठवले (क्रीडा मंत्रालयाचे राष्ट्रीय निरीक्षक) प्राचार्य कॅप्टन डॉ. मोसेस कोलट उपस्थित होते. विजेत्या विद्यार्थ्यांची घोषणा करण्यात आली आणि त्यांना ट्रॉफी आणि मेडल्स देऊन सन्मानित करण्यात आले.



**ग्रंथालय विभागातर्फे शहीद दिवस साजरा**

ग्रंथालय विभागातर्फे २३ मार्च २०२२ रोजी शहीद दिवस साजरा करण्यात आला. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी विद्यार्थ्यांना शहीद दिवसाबद्दलची माहिती दिली.

**पालक – शिक्षक सभा जीवरसायनशास्त्र ५ मार्च २०२२**

जीवरसायनशास्त्र विभागातर्फे पालकसभा ऑफलाईन पद्धतीने संपन्न झाली. विभागातर्फे द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष विज्ञान शाखेकरता ५ मार्च २०२२ रोजी पालक सभा संपन्न झाली.

विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयातील प्रगतीबाबत आढावा त्यांच्या पालकांना देण्याकरता पालकसभांचे आयोजन विविध विषयांच्या विभागातर्फे करण्यात येते. तसेच विभागीय क्रियाकलापांबद्दल पालकांना माहिती देणे, वेळापत्रक, आगामी परीक्षा, उपस्थिती आणि एकूणच विभागातील विद्यार्थ्यांची कामगिरी या विषयाबाबत बाबत पालक-सभांमध्ये आढावा घेतला जातो.

एकूण ३३ पालकांनी या सभेमध्ये आपला सहभाग नोंदवला होता.



**दीक्षान्त सोहळा**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), ठाणे यांचा दीक्षान्त समारंभ दि. ३० मार्च रोजी सकाळी ११.३० वाजता पाणिनी सभागृहात पार पडला. या समारंभाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोजेस कोलेट, विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर हे प्रमुख पाहुणे होते. डॉ. सिद्धिविनायक बर्वे, संचालक सायंटिफिक रिसर्च सेंटर, केळकर एज्युकेशन ट्रस्ट, मुलुंड हे सन्माननीय अतिथी, तर विद्या प्रसारक मंडळ डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेचे संचालक डॉ. नीतिन जोशी हे विशेष अतिथी होते. सोबतच सर्व विभागांचे विभाग प्रमुखही या सोहळ्याला उपस्थित होते.

कोरोना रुग्ण संख्या आटोक्यात आल्यानंतर महाविद्यालये ऑफलाईन सुरू झाली असून कोरोना काळानंतरचा हा पहिला ऑफलाईन पदवी प्रदान सोहळा ठरला. या दीक्षान्त समारंभामध्ये पदवी आणि पदव्युत्तर मिळून १४ विभागांमधून प्रथम ५ क्रमांकावरच्या ७० विद्यार्थ्यांचा पदवीदान सोहळा यावेळी पार पडला. उर्वरित विद्यार्थ्यांचा त्यांच्या विभागात दि. ३० मार्च दुपार आणि दि. ३१ मार्च रोजी पदवी प्रदान सोहळा संपन्न झाला.

प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील हा सोनेरी दिवस असतो असे सांगत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोझेस कोलेट यांनी महाविद्यालयाला स्वायत्तता मिळाल्यानंतर हा पहिला दीक्षान्त सोहळा आहे असे सांगत आपला आनंद व्यक्त केला. डॉ. विजय बेडेकर यांनी सगळ्या विद्यार्थ्यांना पदवीदान सोहळ्यातील शपथेचे महत्त्व समजावत शपथेचे वाचन केले. डॉ. सिद्धिविनायक बर्वे आणि डॉ. नीतिन जोशी यांच्या मोलाच्या मार्गदर्शनपर शब्दांनी विद्यार्थ्यांचा हुरूप वाढवला.

सभागृहात विद्यार्थी म्हणून शिरलेली मुले पदवीदान सोहळ्यानंतर ग्रॅज्युएट होऊन मोठ्या आनंदात बाहेर पडली.



## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

२ मार्च : जी. जे. अडवाणी विधी महाविद्यालयातील दोन प्राध्यापकांच्या कॅस पदोन्नती संदर्भात प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांनी मुंबई विद्यापीठातर्फे विषय तज्ज्ञ म्हणून काम पाहिले.

प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांचा सहयोगी प्राध्यापक म्हणून पदोन्नती २०१८ पासून लागू करण्यास मुंबई विद्यापीठाने मान्यता दिली.

प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांना जय भगवान विधी महाविद्यालयाच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी 'जेंडर जस्टिस् पॅरिटी इन पॉलिटिकल ऑफिसेस' ह्या विषयावर भाष्य केले.

प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांना मुंबई विद्यापीठातर्फे विषय पदव्युत्तर प्राध्यापक म्हणून मान्यता मिळाली. त्या संदर्भातील पत्र विद्यापीठातर्फे दिनांक १६ मार्च रोजी प्राप्त झाले.

**प्रकाशन**




'चेंजीग परस्पेक्टीव्ह ऑफ ॲनिमल लॉ' (ISBN-978-93-92926-14-3) सदर पुस्तकामध्ये प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांचा धडा दुसऱ्या क्रमांकावर प्रकाशित झाला असून, त्याचे शीर्षक 'राइटस् मॉडेल ऑफ प्रिव्हेनशन ऑफ कृएल्टी ॲण्ड बीयोण्ड' आहे. सदर पुस्तकाचे प्रकाशन प्रा. डॉ. अकील अली सय्यद, पारूल विद्यापीठ ह्यांनी केले आहे.

एल.एल.एम. आणि एल.एल.बी. ३ वर्ष अतिरिक्त तुकडीस विद्यापीठाची संलग्नता प्राप्त होण्यासाठी महाविद्यालयाने केलेल्या अर्जाच्या संदर्भात महाविद्यालयातील पायाभूत सुविधांच्या तपासणीसाठी विद्यापीठ तज्ज्ञ समितीने ४ मार्च, २०२२ रोजी भेट दिली असून त्यांनी आमच्या पायाभूत सुविधांबद्दल समाधान व्यक्त केले.



**सुप्रिम कोर्टाचे कौतुक पत्र**

व्हि.पी.एम. टी.एम.सी. विधी महाविद्यालय, ठाणे आणि ठाणे विधी सेवा प्राधिकारण यांनी आजादी का अमृतमहोत्सव कार्यक्रम राबविल्याबद्दल सुप्रिम कोर्टाद्वारे कौतुक पत्र २ मार्च, २०२२ रोजी प्राप्त झाले.



द्वितीय आणि तृतीय वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांची अंतर्गत परीक्षा आणि असाइनमेंट सबमिशन हे दिनांक १ आणि २ मार्च रोजी झाले.

दिनांक १२ मार्च २०२२ रोजी डी.पी.सी.-दोनची परीक्षा घेण्यात आली.

दिनांक ५ मार्च, २०२२ रोजी महाविद्यालयाच्यावतीने २०१८-२०१९, २०१९-२०२० आणि २०२१ चे कॉलेज डेव्हलप कमिटीचे रिपोर्ट मुंबई विद्यापीठाने सांगितल्याप्रमाणे पाठविण्यात आले.

**आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त कार्यक्रम**



विद्या प्रसारक मंडळाचे ठा.म.पा. विधी महाविद्यालय, ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकारण यांच्या वतीने दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजता गुगल, मीटवर ऑनलाईन पद्धतीने 'बार आणि बेंचमध्ये महिलांचे स्थान' या विषयावर वरिष्ठ अधिवक्ता श्रीमती सुनिता कापरेकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी यावेळेस अनेक दाखले देऊन महिला कशाप्रकारे चांगल्या अधिवक्ता आणि न्यायाधीश झाल्या आहेत याची उदाहरणे दिली. यावेळी प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली आणि पाहुण्यांची ओळख करून दिली.





कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हेतल मिशेरी यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. रश्मी नाटेकर यांनी केले.

**वक्तृत्व स्पर्धा**

महाविद्यालयाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त वत्कृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. महिलांच्या प्रगतीसाठी एखादा कायदा किंवा सुधारणा सुचविणे असा विषय होता. या स्पर्धेत एकूण १२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेचे विजेते खालील प्रमाणे -

१) प्रथम क्रमांक - रिद्धी पेडणेकर

२) द्वितीय क्रमांक - नीता सनी

३) तृतीय क्रमांक - साक्षी डागा

४) उत्तेजनार्थ - जगन्नाथ कुलकर्णी

**माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन**

ॲड. श्री. संजय म्हात्रे व ॲड. श्री. राज नलगे ह्या महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांनी 'रजनेश विरुद्ध नेहा' ह्या सुप्रिम कोर्टाने दिलेल्या निकालाचे महत्त्व ह्या संदर्भात त्यांनी व्याख्यान दिले.

---

स्वार्थ जायला 'नामा'सारखे दुसरे साधन नाही.

दिनांक १२ मार्च, २०२२ रोजी माजी प्राध्यापकांचे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले. त्यांनी केलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.



दिनांक १२ मार्च, २०२२ रोजी प्रथम वर्ष विधीच्या प्रवेशप्रक्रिये संदर्भात ए.आर.ए.चे काम पूर्ण झाले.

दिनांक १२ मार्च, २०२२ रोजी ५० विद्यार्थ्यांसह प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांनी सन्मानीय न्यायाधीश श्री. अभय ओक सर्वोच्च न्यायालय ह्यांचे मार्गदर्शनपर व्याख्यानात सहभाग नोंदविला. सदर संभाषण यशवंतराव प्रतिष्ठानातर्फे सहयोग मंदिर ह्या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. ओक सरांनी 'न्यायिक प्रक्रिया संकल्पना आणि गैरसमज' ह्या विषयावर आपले मत मांडले. यशवंतराव प्रतिष्ठान ह्यांच्या आमंत्रणाबद्दल व सहयोगाबद्दल महाविद्यालय कृतज्ञ आहे. सदर कार्यक्रमात व्हिजिटिंग फॅकल्टी ॲड. श्री. यतीन पंडित ह्यांनी देखील सहभाग नोंदविला.



**माननीय न्यायमूर्ती अभय ओक, न्यायाधीश सर्वोच्च न्यायालय**

**जागतिक ग्राहक हक्क दिवस**

दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी महाविद्यालयातील माजी विद्यार्थिनी ॲड. श्रीमती भावना पिसाळ ह्यांनी 'ग्राहक संरक्षण कायद्यामधील करिअर' ह्या विषयावर मार्गदर्शन केले.

जागतिक ग्राहक दिवसाचे औचित्यसाधून त्या दिवशी केस कमेंट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. डि.एल.एफ. होम डेवलपर्स विरूद्ध कॅपिटलस् ग्रीन फ्रन्ट बायर्स असोसिएशन (२०२० सुप्रिम कोर्ट) ह्या निकालावर विद्यार्थ्यांनी आपली मते नोंदविली. सदर स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे –

प्रथम बक्षीस – श्री. निशीत गावंडे (जी. जे. अडवाणी विधी महाविद्यालय मुंबई)

दुसरे बक्षीस – मिस. भाग्यश्री चव्हाण (वि.प्र.मं.चे ठा.म.पा. विधी महाविद्यालय, ठाणे)

तिसरे बक्षीस – श्री. अनघ विजय ममदापूर (जी.जे अडवाणी विधी महाविद्यालय मुंबई)

दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी सायंकाळी ५ वाजता सहसंचालक, पनवेल यांनी आभासी माध्यमातून महाविद्यालयातील कॅस संदर्भातील जी प्रकरणे प्रलंबित असतील त्या संदर्भात सूचना दिल्या.

दिनांक १५, १६, १७ आणि १९ रोजी द्वितीय आणि तृतीय वर्ष विधी विद्यार्थ्यांची अंतर्गत वायवा (VIVA) परीक्षा घेण्यात आली.

दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी सत्र – V च्या परीक्षेचा निकाल मुंबई विद्यापीठाने जाहीर केला.

विद्या प्रसारक मंडळाच्या प्रांगणातील बी. एन. बांदोडकर सायन्स महाविद्यालयाच्यावतीने जागतिक जल दिनानिमित्त स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

प्रपंचातील विघ्ने ही सूचनावजा असतात.

सदर स्पर्धेमध्ये आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी खालील प्रमाणे बक्षिसे मिळवली.

**इ–पोस्टर स्पर्धा**

प्रथम बक्षीस – श्री. प्रदीप भाऊ गायकर (तृतीय वर्ष विधी)

**घोषणा (स्लोगन) स्पर्धा**

प्रथम बक्षीस – श्री. प्रमोद बोडके (द्वितीय वर्ष विधी) (मराठी स्लोगन)

द्वितीय बक्षीस – मिस प्रियदर्शनी मुळे–लोटनकर (प्रथम वर्ष विधी) (इंग्लीश स्लोगन)

नारी गुरसहानी विधी महाविद्यालय, उल्हासनगर यांनी ब्लॉग लेखन स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेमध्ये आमच्या महाविद्यालयातील द्वितीय वर्ष विधीच्या विद्यार्थिनी मिस. नेहा बहेलिया हिने तिसरे बक्षीस मिळविले आहे.

**फ्रेशर्स वादविवाद आणि अभिरूप न्यायालय स्पर्धा**

दिनांक ३० आणि ३१ मार्च २०२२ रोजी प्रथम विधीच्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाने फ्रेशर्स वादविवाद आणि अभिरूप न्यायालय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. वादविवाद स्पर्धेचे परीक्षक ह्या ॲड. विद्या गायकवाड होत्या, तर अभिरुप न्यायालय स्पर्धेचे परीक्षक ॲड. यतीन पंडित हे होते. या स्पर्धेचे सूत्रसंचालनाचे आणि आभार प्रदर्शनाचे काम प्रा. हेतल मिशेरी यांनी पाहिले. अभिरूप न्यायालय स्पर्धेसाठी विषय नुकसान भरपाई कायद्याच्या अंतर्गत खोटे कारावास तर वादविवाद स्पर्धेसाठी विषय खालील प्रमाणे आहेत.

१) एच.एस.सी. कला, विज्ञान, वाणिज्य, एच.एस.सी कायदा ही आजच्या काळाची गरज.

२) जर उमेदवारासाठी ती तृतीय पदवी असेल तर एल.एल.बी. ३ वर्ष प्रवेश प्रक्रियेसाठी आरक्षणाचे फायदे देण्यात येऊ नयेत.

वादविवाद स्पर्धेचे विजेते खालील प्रमाणे

प्रथम – मिस. जुईली केटवाणी

द्वितीय – मिस. नीता सनी

तृतीय – मिस. माधुरी, मिस. मोनिका नेमानी

अभिरूप न्यायालय स्पर्धेचे विजेते खालील प्रमाणे –

प्रथम – मिस. जुईली केटवाणी

द्वितीय – मिस. निलाकक्षी त्रिपाठी

तृतीय – श्री परमेश्वरण शिवरामकृष्णन

विशेष कौतुक मराठी मूटर – श्री. शाबीक शेख

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

१) २२ मार्च २०२२ जागतिक जल दिवसाचे औचित्य साधून विद्या प्रसारक मंडळाच्या बांदोडकर कॉलेज ऑफ सायन्स (स्वायत्त) च्या ''Environmental Science, Biodiversity, Wildlife Conservation and Management'' विद्यार्थी विभाग आणि ठाणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन विभागाच्या संयुक्त विद्यमाने ''Inter Collegiate'' स्पर्धा घोष वाक्य व ई–पोस्टर स्पर्धा आयोजित केली. स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे –

अ) तन्वी मोरे – तृतीय क्रमांक – द्वितीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग (ई–पोस्टर स्पर्धा)

ब) रोहित गाढे (मराठी घोष वाक्य) – द्वितीय वर्ष इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीम उत्तेजनार्थ, घोषवाक्य स्पर्धा

क) पूर्वा थत्ते (इंग्लिश घोष वाक्य) – तृतीय वर्ष इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीम, घोषवाक्य स्पर्धा

२) रोटरी क्लब ऑफ ठाणे स्कायलाईन व विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २८/३/२०२२ रोजी १.३० ते ३.०० वाजता विद्यार्थिनींसाठी स्वयं-रक्षणावर कार्यशाळा आयोजित केली. श्री. योगेश होनावरकर (प्रशिक्षक) ISSA CPT Excercise Physiologist & sports science expert- Waterfood Institute Ireland Team Legacy Fitneth). सदर कार्यशाळेला ७० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. सदर कार्यशाळेत उत्तम प्रशिक्षण, प्रात्यक्षिक दाखविले. सदर कार्यशाळेचे डॉ. उषा राघवन यांनी Program co-ordinator म्हणून कार्यभाग सांभाळला.

३) ठाकूर पॉलिटेक्निकने तंत्र उत्सव पेपर प्रेझेन्टेशन स्पर्धा २४ मार्च २०२२ रोजी आयोजित केली. या स्पर्धेत द्वितीय वर्षी कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागाच्या सार्थक तिवाड याला प्रथम पारितोषिक मिळाले.

४) इन्व्होशन सेल तर्फे ७ मार्च २०२२ हा दिवस 'राष्ट्रीय शास्त्र दिवस' म्हणून साजरा केला. या दिवशी 'Poster Presentation Competition' आयोजित केली. सदर स्पर्धेला प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या २० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. दिनांक ८/४/२०२२ रोजी स्पर्धेचा निकाल जाहीर झाला.

**प्रथम पारितोषिक –** पालकर यश प्रवीण – प्रथम वर्ष इन्स्ट्र्यूमेन्टेशन

**द्वितीय पारितोषिक –** मुळे मंदार शशिकांत – प्रथम वर्ष इन्डस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स

**तृतीय पारितोषिक –** सोंडकर नंदिनी सुनील – प्रथम वर्ष इन्डस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स

भारडे कैफ कैसार – प्रथम वर्ष इलेक्ट्रिकल पावर सिस्टीम

**उत्तेजनार्थ पारितोषिक –**

१) चाऊस सारा मेहबूब – प्रथम वर्ष इन्डस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स

२) झा मेहर बबलू – प्रथम वर्ष इन्डस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स

३) मटकर स्नेहा शामकांत – प्रथम वर्ष इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी

४) कदम रुपाली दशरथ – प्रथम वर्ष इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**मार्च २०२२ मधील कार्यक्रम / वार्ता**

३ मार्च : डॉ. व्ही.एन. ब्रिम्स तर्फे 'एक्स्प्रेशन्स : महोत्सव अपनी मातृभाषा का!' या विषयसूत्रावर आधारित आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वत: त्यांच्या मातृभाषेत लिहिलेल्या कविता, लेख, गाण्यांचे सादरीकरण या कार्यक्रमात करण्यात आले. या कार्यक्रमासाठी व्हीपीएमच्या जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागातील सहाय्यक प्राध्यापक, डॉ. प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. मातृभाषेचे महत्त्व आणि विविध भाषांमुळे त्यांना संस्कृती समजण्यास कशी मदत झाली हे सांगून त्यांनी उपस्थितांना संबोधित केले. तंत्रज्ञान आणि ट्विटर, इंस्टाग्राम सारख्या सोशल मीडियाच्या मदतीने भाषा कौशल्ये विकसित करण्यास तसेच भाषेचा प्रसार करण्यास कशी मदत होऊ शकते हे देखील त्यांनी सांगितले. प्रा. मुग्धा भडकमकर यांनी विद्यार्थी विकास समितीच्या सभासदांच्या साहायाने या कार्यक्रमाचे समन्वयन केले. विद्यार्थी प्रतिनिधी कादंबरी कावळे व ओंकार भानुशाली यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.




४ मार्च : डॉ. नीतिन जोशी बंगलोरच्या एअरबस (AIRBUS) व्यावसायिकांसोबतच्या बैठकीला उपस्थित राहिले.




५ मार्च : डॉ. व्ही.एन. ब्रिम्सच्या रोजगार नियुक्ती विभाग आणि माजी विद्यार्थी संघातर्फे एम एम एस २०२१-२३ आणि २०२०-२२ च्या विद्यार्थ्यांसाठी चर्चा या ऑनलाइन सत्राचे आयोजन करण्यात आले. श्री. गौरव समेळ (माजी विद्यार्थी २०११-१३) यांनी 'उद्योगासाठी स्वतःला तयार करणे' या विषयावर तर श्री. अपूर्व मोडक (माजी विद्यार्थी २०१६-१८) यांनी 'मुलाखतीसाठी स्वतःला कसे तयार करावे.' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.




८ मार्च : आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने, डॉ. व्ही.एन. ब्रिम्सच्या महिला विकास समिती तर्फे 'विद्यार्थिनी आणि महिला कर्मचारी सदस्यांसाठी ब्रेकिंग द ग्लास सिलिंग' या विषयावर इंटिग्रेटेड इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी प्रा. लि.च्या व्यवस्थापकीय संचालक, श्रीमती सुजाता सोपरकर यांचे तसेच, 'महिला आरोग्य आणि स्वच्छता' या विषयावर डॉ. सुप्रिया चिंचोळकर यांच्या अतिथी सत्राचे अतिथी सत्राचे आयोजन करण्यात आले.





११ मार्च : डॉ. व्ही.एन. ब्रिम्सच्या आय. आय. सी. समितीतर्फे प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी 'पोलाद निर्मितीच्या प्रक्रियेचा वैज्ञानिक शोध ज्याने जागतिक अर्थशास्त्र बदलले' या विषयावर डॉ. सुधाकर आगरकर यांचे अतिथी सत्र आयोजित केले.



११ मार्च : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा आणि विद्यार्थी विकास समितीच्या सदस्यांनी ब्रिम्स कनेक्ट या मासिक कार्यक्रमाचे आयोजन केले.

१५ मार्च : डॉ. नीतिन जोशी, डॉ. स्मिता जपे आणि डॉ. पंकज नंदूरकर यांनी, आय क्यू ए सी तर्फे, एस. एन. डी. टी. येथे आयोजित केलेल्या रिसर्च इन कॉन्टेक्स्ट ऑन एन इ पी २०२० या विषयावरील चर्चासत्रात भाग घेतला.

१५ मार्च : डॉ. व्ही एन ब्रिम्स आणि क्रिप्टो विद्यापीठ यांच्यात शैक्षणिक भागीदारीसाठी सामंजस्य करार करण्यात आला.



१६ मार्च : एम एम एस २०२१-२२ तुकडीच्या तृतीय सत्र परीक्षेत गौरी कदम या मार्केटिंग शाखेच्या विद्यार्थिनीने ओ श्रेणीसह प्रथम क्रमांक मिळविला.

२६ मार्च : प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी आयआयएम उदयपूरच्या प्रा. विजयता दोशी यांनी आयोजित केलेल्या 'क्राफ्टिंग अँड कंडक्टिंग हाय-क्वालिटी क्वालिटेटिव्ह रिसर्च' या विषयावरील ५ दिवसीय संशोधन कार्यशाळा पूर्ण केली.






२६ आणि २७ मार्च : डॉ. नीतिन जोशी व्हीपीएमच्या महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर येथे 'रोल ऑफ सायन्स कम्युनिकेटर्स' या विषयावरील परिषदेला उपस्थित राहिले.

२८ मार्च : प्रा. कला महादेवन आणि प्रा. कृणाल के. पुंजानी यांचा, 'ऑगमेंटेड अँड व्हर्चुअल रिऍलिटी इन अपेरल इंडस्ट्री : अ बिब्लिओमॅट्रिक रिव्हियू अँड फ्युचर रिसर्च अजेंडा' हा शोधनिबंध 'फोरसाइट' या H-30 निर्देशांक असलेल्या व स्कोपस Q2 मध्ये स्थान असलेल्या एमराल्ड नियतकालिकामध्ये स्वीकारला गेला.

डॉ. व्ही.एन. ब्रिम्सच्या आय. आय. सी. समिती व उद्योजकता कक्षा (E - Cell) तर्फे डॉ. पंकज नंदूरकर यांनी खालील अतिथी सत्रे आयोजित केली.

१० मार्च : ब्लॉकचेन-सक्षम स्टार्ट-अप आणि उद्योजकता - श्री. अजॉय पाठक आणि श्री. देवेश चावला

११ मार्च : पॉवर ऑफ बिलीफ - डॉ. सतविंदर सिंग बेदी (सहयोगी प्राध्यापक, गुरू नानक इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज)

१५ मार्च : उद्योजकतेवर चर्चा - श्री अर्जुन देशपांडे (जेनेरिक आधारचे संस्थापक आणि सीईओ).

•••

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

नाशिक आकाशवाणी केंद्राचे प्रमुख श्री. शैलेश माळोदे यांनी केले. तर, 'शेतकरी विज्ञाननिष्ठ कसा होईल?' यासंबंधीचे विचार डॉ. श्याम जोशी यांनी मांडले. ''शेती हा व्यवसाय आपल्याकडे परंपरागत पद्धतीने केला जातो. विज्ञानाचा आधार घेऊन या व्यवसायात अनेक सुधारणा घडवून आणणे शक्य आहे. त्यासाठी आवश्यक ती वैज्ञानिक तत्त्वे शेतात काम करणाऱ्या मजुरांना समजावून देण्याची गरज आहे. हे मजूर बऱ्याचदा अशिक्षित किंवा अल्पशिक्षित असतात. त्यांच्या पातळीवर जाऊन वैज्ञानिक सिद्धांत स्पष्ट करणे हे फारच कठीण काम आहे. अशावेळेस, 'आधी केले मग सांगितले' हा मार्ग स्वीकारणे हिताचे ठरते.'' असे मत खेडमध्ये स्वतः शेती करणारे डॉ. जोशी यांनी व्यक्त केले. याच विचारांशी सुसंगत असे मत प्राचार्य मराठे यांनी मांडले. ''तळागाळातील लोकांपर्यंत विज्ञान पोहोचवायचे असेल तर आपल्याला स्थानिक भाषेचा आधार घेण्याची गरज आहे'' असे ते म्हणाले.

''विज्ञानाने मानवी जीवनाचा कायापालट केला आहे. अनेक नैसर्गिक प्रक्रिया कृत्रिमरीत्या करता येऊ लागल्या आहेत. इन्शुलिनचे उत्पादन, टेस्ट ट्यूब बेबी ही याची काही मासलेवाईक उदाहरणे आहेत. सध्याचा जगाचा उल्लेख द ब्रेव न्यू वर्ल्ड (The Brave New World) असा करतात. या विकसित जगात विविध प्रकारचे संदेश दिले जातात. त्यातील काही सेल्फ हेल्प प्रकाराचे असतात. अशा संदेशातील वैज्ञानिक तत्त्व विशद करण्याची जबाबदारी विज्ञान प्रसारकावर पडते'' असे मत श्री. विठ्ठल नाडकर्णी यांनी व्यक्त केले. श्री. नाडकर्णी यांनी विज्ञान प्रसाराच्या क्षेत्रात अनेक वर्षे मुशाफिरी केली आहे. टाइम्स ऑफ इंडिया वृत्तपत्राशी ते अनेक वर्षे संबंधित होते. या वृत्तपत्र समूहाकडून प्रकाशित होणाऱ्या 'सायन्स टुडे' या मासिकाचे काही वर्षे त्यांनी संपादन केले होते.

परिसंवादाचे समारोपीय भाषण प्राध्यापक बी. एन. जगताप यांनी केले. भाभा अणुसंशोधन केंद्रातील यशस्वी कारकीर्द पूर्ण झाल्यावर त्यांनी मुंबईच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मध्ये भौतिकशास्त्र शिकविण्याचे काम स्वीकारले आहे. विविध वक्त्यांच्या विचारांचा ऊहापोह करून विज्ञान प्रसारातील अनेक खाचाखोचा त्यांनी विशद केल्या. एकंदरीत हा परिसंवाद उत्तम पद्धतीने आयोजित करण्यात आला होता. प्रत्यक्ष उपस्थित प्रेक्षकांची संख्या जरी कमी असली तरी अनेकजणांनी या परिसंवादात दूरदृश्य प्रणालीने सहभाग घेतला. लंडन मध्ये स्थायिक झालेले डॉ. सतीश देसाई या परिसंवादाला पूर्ण वेळ उपस्थित होते. त्यांनी देखील इंग्लंड मधील विज्ञान प्रसाराचे आपले अनुभव पटलावर मांडले.

**- डॉ. सुधाकर आगरकर**

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.